विजय शेलुकर
सा. प्र. वि.
जि. प. अ.

P2 (5)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास विभाग

# महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६

(३१ डिसेंबर १९९० पर्यंत सुधारित)

१९९२

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

[ किंमत रुपये ४·२५ पैसे ]

(१) शासकीय अधिसूचना, ग्रा. वि. वि. क्र. डीएसआर १६६६/व्ही, दिनांक ६ मार्च १९७०

(२) शासकीय अधिसूचना, ग्रा. वि. वि., क्र. डीएसआर १६७१/६९०४/एस, दिनांक ६ डिसेंबर १९७१.

(३) शासकीय अधिसूचना, ग्रा. वि. वि., क्र. डीएसआर १६७१/५३०८९/एस, दिनांक १४ जून १९७२.

(४) शासकीय अधिसूचना, ग्रा. वि. वि., क्र. पीएफआर १०७६/३५४३/१७२२/अकरा, दिनांक १ जून १९७८.

(५) शासकीय अधिसूचना, ग्रा. वि. वि., क्र. पीएफआर १०७९/६३२/सीआर. २१२०, दिनांक २ जुलै १९८५.

अन्वये सुधारित

शासकीय अधिसूचना, ग्रा. वि. वि., क्र. डीएसआर १६६२/व्ही, दिनांक २२ ऑगस्ट १९६६.

१. **संक्षिप्त नाव व (नियम) लागू करणे.**—(अ) या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६ असे म्हणता येईल.

(ब) ते—

(एक) नियम ४, पोटनियम (५) मध्ये उल्लेखिलेला तीन महिन्यांचा कालावधी संपल्याच्या तारखेच्या लगतनंतर येणाऱ्या तारखेस व त्या तारखेपासून, जे कर्मचारी यथास्थिती मंडळाचे किंवा राज्य शासनाचे कर्मचारी असण्याचे ज्या तारखेपासून बंद होतील अशा तारखेच्या लगतपूर्वी त्यांना लागू असलेले सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम लागू व्हावे अशी ज्यांनी निवड केलेली नाही अशा विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यांना;

(दोन) नेमलेल्या दिवसापासून, कोणत्याही इतर कर्मचाऱ्यांना [खंड (क) मध्ये उल्लेखिलेले कर्मचारी वगळून]

लागू होतील.

(क) ते—

(एक) मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१ वा) या अन्वये स्थापन केलेल्या भविष्यनिर्वाह निधी नियमांचे उपबंध ज्या कर्मचाऱ्यांना लागू होत असतील अशा कर्मचाऱ्यांना ;

(दोन) अंशकालीन किंवा रोजंदारीवर, कार्यव्ययी आस्थापना किंवा आकस्मिकता निधीतून वेतनप्राप्त आस्थापना (कॉन्टिजन्सी पेड एस्टॅब्लिशमेन्ट) किंवा राज्य शासनाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, अधिनियमाच्या कलम २५३ अन्वये कंत्राटावर नेमलेल्या इतर इसमांना

लागू होणार नाहीत.

**व्याख्या**

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत—

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ ;

(ब) "लेखा अधिकारी" म्हणजे, जिल्हा परिषदेचा मुख्य लेखा व वित्त अधिकारी ;

(क) "विभागणीप्राप्त कर्मचारी" म्हणजे, जो इसम, कलम २४१ चे उपबंध लागू करून दिनांक १ मे १९६२ पासून जिल्हा परिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी होत असेल असा कोणताही इसम [1][ज्यास अधिनियमाच्या कलम २४२ किंवा कलम २५३ क अन्वये, बदलीच्या तारखेपासून जिल्हा सेवेत अंतिम रीत्या नेमून देण्यात आले आहे.] असा राज्य शासन सेवेचा कोणताही सदस्य ;

[2][(कअ) "बदलीची तारीख" म्हणजे कलम २४१ चे उपबंध प्रवर्तनात आल्यामुळे जो जिल्हा परिषदेचा अधिकारी किंवा सेवक होत असेल त्या वाटपप्राप्त कर्मचाऱ्याच्या बाबतीत, नेमून दिलेला दिवस, आणि अधिनियमांचे कलम २४२ किंवा कलम २५३-क अन्वये जिल्हा सेवेत ज्यास अंतिम रीत्या नेमून दिले असेल अशा वाटपप्राप्त कर्मचाऱ्याच्या बाबतीत, त्याला ज्या तारखेस जिल्हा सेवेत अंतिम रीत्या नेमून देण्यात आले असेल ती तारीख.]

(ड) "नेमलेला दिवस" म्हणजे, हे नियम ज्या दिवशी अंमलात येतील तो दिवस ;

(इ) "मंडळ" म्हणजे, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ या अन्वये स्थापन केलेले जिल्हा स्थानिक मंडळ, हैदराबाद जिल्हा मंडळ अधिनियम, १९५५ या अन्वये प्रस्थापित केलेले जिल्हा मंडळ आणि मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक शासन अधिनियम, १९४८ या अन्वये प्रस्थापित केलेली जनपद सभा ;

(फ) "महामंडळ" म्हणजे, भारताचे आयुर्विमा महामंडळ ;

(ग) "जिल्हा सेवा" म्हणजे अधिनियमाच्या कलम २३९, खंड (ब) अन्वये प्रस्थापित केलेली जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) किंवा जिल्हा सेवा (वर्ग चार) ;

(ह) "वितलब्धी" म्हणजे, या नियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आलेली असेल त्याव्यतिरिक्त मुंबई मुलकी सेवा नियम, १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे पगार, रजावेतन किंवा निर्वाह अनुदान यामध्ये परसेवेच्या संबंधात मिळालेल्या पगाराच्या स्वरूपातील कोणतेही पारिश्रमिक ;

[3][**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, परिषद वेतनश्रेणीप्रमाणे वेतन न घेणारे प्राथमिक, माध्यमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक व इतर परिषद सेवक यांच्या बाबतीत खालील याच्या स्तंभ १ मध्ये नमूद केलेल्या त्यांच्या वेतनश्रेणीसमोर स्तंभ (२) मधील अनुक्रमे नर्दिष्ट केलेला महागाई भत्त्याचा भाग वेतन म्हणून मोजण्यात येईल :—

**तक्ता**

| वेतनश्रेणी (१) | महागाई भत्त्याचा भाग (२) |
|---|---|
| रुपये आणि त्याहून कमी .. .. .. | ३५ रुपये |
| रुपये आणि त्याहून अधिक २०० रुपयांपर्यंत .. .. | ४५ रुपये |
| रुपये आणि त्याहून अधिक ५०० रुपयांपर्यंत .. .. | ५० रुपये |
| रुपये आणि त्याहून अधिक .. .. .. | ६५ रुपये.] |

१. दिनांक ६ डिसेंबर १९७१ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर ल करण्यात आला.

२. वरील शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. दिनांक ६ मार्च १९७० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात ।.



(एफ) "कुटुंब" म्हणजे—

(एक) पुरुष वर्गणीदाराच्या बाबतीत त्याची पत्नी किंवा त्याच्या पत्नी व मुले आणि वर्गणीदाराच्या मृत मुलाची विधवा किंवा मुलाच्या विधवा व मुले :

परंतु, वर्गणीदाराने आपली पत्नी आपल्यापासून न्यायिक रीत्या विभक्त झाली आहे किंवा ती ज्या समाजाची असेल त्या समाजाच्या रूढीगत विधी अनुसार भरणपोषणाचा तिचा हक्क तिला राहिला नसल्याचे सिद्ध केल्यास, या नियमांशी ज्या विषयाचा संबंध पोचतो त्या विषयाबाबत ती वर्गणीदाराच्या कुटुंबाची यापुढे केव्हाही सदस्य नसल्याचे समजण्यात येईल; मात्र, वर्गणीदाराने तत्पश्चात तिला पुढेही अशाप्रकारे समजण्यात येईल अशी लेखा अधिकाऱ्यास स्पष्ट लेखी अधिसूचनेद्वारे सूचना द्यावयास हवी.

(दोन) वर्गणीदार स्त्रीच्या बाबतीत वर्गणीदार स्त्रीचा पती व मुले आणि वर्गणीदार स्त्रीच्या मृत मुलाची विधवा किंवा मुलाच्या विधवा व मुले :

परंतु वर्गणीदार स्त्री ही जर लेखा अधिकाऱ्यास लेखी अधिसूचनेद्वारे आपल्या पतीला आपल्या कुटुंबामधून वगळण्याची इच्छा प्रकट करील तर, वर्गणीदार स्त्रीने त्यास वगळण्याबाबतची आपली अधिसूचना लेखी स्वरूपात नंतर रीतसर रद्द केली नसेल तर, या नियमांशी ज्या विषयाचा संबंध पोचतो त्या विषयाबाबत तिचा पती, यापुढे केव्हाही अभिदायीच्या कुटुंबाचा सदस्य नसल्याचे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या नियमाच्या प्रयोजनाकरिता, "मूल" म्हणजे औरस मूल आणि त्यामध्ये वर्गणीदाराच्या व्यक्ती-विधी अन्वये दत्तकग्रहण हे विधीमान्य असून त्या मुलास औरस मुलाचा दर्जा मिळाला आहे अशी लेखा अधिकाऱ्याची किंवा त्याच्या मनात कोणतीही शंका उद्भवल्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, दत्तक मुलाचा समावेश होतो ; आणि "मुले" या शब्दप्रयोगाचा त्यानुसार अर्थ लावण्यात येईल;

(ज) "स्वीयेतर सेवा" म्हणजे, ज्या सेवेत परिषदेच्या कर्मचाऱ्याला जिल्हा परिषदेच्या मंजुरीने, तिच्या जिल्हा निधिव्यतिरिक्त, कोणत्याही साधनाद्वारे पगार मिळतो अशी सेवा ;

(के) "कार्यालय प्रमुख" म्हणजे, पंचायत समितीखाली काम करणाऱ्या परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या संबंधात गट विकास अधिकारी आणि प्रत्यक्षपणे जिल्हा परिषदेखाली काम करणाऱ्या परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या संबंधात मुख्य कार्यकारी अधिकारी आणि त्यामध्ये, जिल्हा परिषदेखालील कोणत्याही कार्यालयाच्या किंवा संस्थेच्या संबंधात, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने कार्यालय प्रमुख म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(ल) "रजा" म्हणजे, मुंबई मुलकी सेवा नियम, १९५९, याद्वारे मान्य केलेली कोणत्याही प्रकारची रजा;

(म) "परिषदेचा कर्मचारी" म्हणजे, कोणत्याही जिल्हा सेवेवर नेमलेला जिल्हा परिषदेचा कर्मचारी आणि त्यामध्ये विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यांचा समावेश होतो;

(न) "भविष्यनिर्वाह निधी" किंवा "निधी" म्हणजे, संबंधित जिल्हा परिषदेचा सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी ;

(ओ) "शाळा मंडळाचा कर्मचारी" म्हणजे, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ या अन्वये प्रस्थापित केलेल्या जिल्हा शाळा मंडळाने कामावर लावलेला आणि जिल्हा सेवेचा सदस्य म्हणून नेमण्यात आलेला इसम;

(प) "वर्ष" म्हणजे, वित्तीय वर्ष.

### भविष्यनिर्वाह निधीची प्रस्थापना व गुंतवणूक

३. (१) प्रत्येक जिल्हा परिषदेच्या परिषद कर्मचाऱ्याकरिता भविष्यनिर्वाह निधी स्थापन करण्यात येईल. तो रुपयात ठेवण्यात येईल आणि संबंधित जिल्हा परिषदेकडून त्याची व्यवस्था पाहण्यात येईल.

(२) राज्य शासन वेळोवेळी देईल अशा अनुदेशास अधीन राहून, जिल्हा निधीची गुंतवणूक ज्या रीतीने करण्यात येते त्या रीतीने भविष्यनिर्वाह निधीची गुंतवणूक करण्यात आली पाहिजे.

४. (१) या नियमात अन्यथा उपबंधित केलेल्या गोष्टींव्यतिरिक्त, स्थायी सेवेत असलेल्या षदेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी निधीत वर्गणीचा भरणा केला पाहिजे.

(२) ज्यांची सतत एक वर्षाची सेवा चालू महिन्याच्या अवधीत पूर्ण होत असेल अशा तात्पुरत्या त असलेल्या (शिकाऊ उमेदवार व परिवीक्षाधीन धरून) परंतु पुन्हा कामावर ठेवलेले निवृत्ति-नधारी इसम वगळून, परिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अशा महिन्यानंतर येणाऱ्या महिन्यापासून ीत वर्गणी दिली पाहिजे.

(३) पोटनियम (१) किंवा (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याचे वेतन दरमहा वीस रुपयांपेक्षा अधिक नसेल, अशा परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास निधीत वर्गणी देण्यास ा पाडता कामा नये.

(४) जो यथास्थिति, मंडळाच्या किंवा राज्य शासनाच्या (अंशदायी भविष्यनिर्वाह निधी लेल्या) भविष्यनिर्वाह निधीचा वर्गणीदार होता अशा कोणत्याही विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यास, ज्या तारखेस यथास्थिति, मंडळाचा किंवा राज्य शासनाचा कर्मचारी असल्याचे बंद झाले असेल ा तारखेच्या निकटपूर्वी त्यास वर्गणीचा दर, व्याजाचा दर आणि सर्वसाधारण भविष्यनिर्वाह ोतून आगाऊ रकमा देणे किंवा त्यातून रकमा काढून घेणे यांचे नियमन करणाऱ्या शर्ती या ात लागू असलेले भविष्यनिर्वाह निधीचे कोणते नियम आपणास लागू असावेत, याबद्दल ड करता येईल.

(५) पोटनियम (४) खालील निवड ही, [1][ज्या विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यांची, त्यांच्या बदलीच्या रखेपासून, उक्त अधिनियमाच्या कलम २४२ किंवा कलम २५३-क अन्वये जिल्हा सेवेत अंतिम या नेमणूक झाली असेल त्या विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अंतिम नेमणुकीच्या रखेपासून दोन वर्षांच्या आत] आणि इतर विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, नेमलेल्या सापासून तीन महिन्यांच्या आत केली पाहिजे. यात कसूर झाल्यास पोटनियम (४) मध्ये लेखिलेल्या विषयांच्या बाबतीत या नियमांचे सर्व उपबंध लागू होतील.

[2][परंतु, कोणत्याही विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यास निवड करण्याबाबतच्या आपल्या हक्काची माहिती ती याबद्दल किंवा लेखी नमूद करावयाच्या कोणत्याही पुरेशा कारणाबद्दल मुख्य कार्यकारी कऱ्याची खात्री पटल्यावर, त्यास कोणत्याही वैयक्तिक प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात ड करण्याची मुदत वाढविता येईल.]

(६) ज्यास, अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमध्ये वर्गणी देण्यास भाग पाडण्यात आले असेल वा परवानगी देण्यात आली असेल अशा परिषदेच्या कर्मचाऱ्यास, जोपर्यंत तो अशा अंशदायी विष्यनिर्वाह निधीमध्ये वर्गणी देण्याचा आपला हक्क आपल्याकडे ठेवील तोपर्यंत अशा परिषदेच्या र्मचाऱ्यास, पोटनियम (१) व (२) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

### नामनिर्देशनपत्रे

५. (१) या नियमाच्या उपबंधास अधीन राहून, निधीत सहभागी होण्याच्या वेळी वर्गणीदाराने ाच्या मृत्यूच्या वेळी भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याच्या खाती जमा असेल अशी रक्कम एका वा अधिक इसमांना मिळण्याचा हक्क प्रदान करणारे नामनिर्देशनपत्र, ती रक्कम देय होण्यापूर्वी वा देय होईल त्यापूर्वी, लेखा अधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे.

---

१. दिनांक १४ जून १९७२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर खल करण्यात आला.

२. दिनांक ६ मार्च १९७० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात ला.

(२) नामनिर्देशनपत्र करण्याच्या वेळी, ज्या वर्गणीदाराचे कुटुंब असेल अशा कोणत्याही अभिदात्याने, त्याच्या कुटुंबातील इसमांव्यतिरिक्त इतर कोणत्याही इसमाच्या किंवा इसमांच्या नावाने कोणतेही नामनिर्देशनपत्र करता कामा नये.

(३) भविष्यनिर्वाह निधीत सहभागी होण्यापूर्वी वर्गणीदार ज्यामध्ये वर्गणी देत होता अशा कोणत्याही इतर भविष्यनिर्वाह निधीच्या संबंधात त्याने केलेले नामनिर्देशनपत्र, जर अशा इतर भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली रक्कम हस्तांतरित करून भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याच्या नावे जमा करण्यात आली असेल तर, तो, या नियमाच्या उपबंधानुसार नामनिर्देशनपत्र तयार करीपर्यंत, या नियमान्वये भविष्यनिर्वाह निधीच्या प्रयोजनार्थ योग्य रीत्या तयार केलेले नामनिर्देशनपत्र असल्याचे समजण्यात येईल.

(४) वर्गणीदार पोटनियम (१) अन्वये एकापेक्षा अधिक इसम नामनिर्देशित करीत असेल त्या बाबतीत त्याने, कोणत्याही वेळी भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याच्या खाती जमा असेल अशी संपूर्ण रक्कम त्यामध्ये समाविष्ट होईल अशा रीतीने प्रत्येक नामनिर्दिष्ट इसमास देय असलेली रक्कम किंवा रकमेचा हिस्सा नामनिर्देशनपत्रात निर्दिष्ट केला पाहिजे.

(५) प्रत्येक नामनिर्देशनपत्र हे, परिस्थितीनुसार योग्य असेल त्याप्रमाणे, पहिल्या अनुसूचित घालून दिलेल्या नमुन्यांपैकी एका नमुन्यामध्ये असले पाहिजे.

(६) वर्गणीदारास कोणत्याही वेळी, लेखा अधिकाऱ्यास लेखी नोटीस पाठवून त्याद्वारे, नामनिर्देशनपत्र रद्द करता येईल; परंतु, त्याने अशा नोटिशीसोबत, या नियमाच्या उपबंधानुसार तयार केलेले नवीन नामनिर्देशनपत्र पाठविले पाहिजे.

(७) वर्गणीदारास नामनिर्देशनपत्रात,—

(अ) कोणत्याही नामनिर्दिष्ट इसमाच्या बाबतीत, तो वर्गणीदाराच्या अगोदर मृत्यू पावल्यास त्या नामनिर्दिष्ट इसमास प्रदान केलेला हक्क हा, पोटनियम (२) च्या उपबंधास अधीन राहून, नामनिर्देशनपत्रात विहित करण्यात येईल अशा इतर इसमाकडे किंवा इसमांकडे जाईल;

(ब) नामनिर्देशनपत्र, त्यामध्ये निर्दिष्ट केलेल्या आकस्मिक घटना घडल्याच्या प्रसंगी, अवैध होईल; अशी तरतूद करता येईल :

परंतु, नामनिर्देशनपत्र तयार करण्याच्या वेळी वर्गणीदाराचे कुटुंब नसेल किंवा त्याच्या कुटुंबामध्ये फक्त एकच व्यक्ती असेल त्या बाबतीत, त्याने, त्यानंतर कुटुंब संपादन केल्याच्या किंवा यथास्थिति, आपल्या कुटुंबामध्ये इतर व्यक्ती (एक किंवा अनेक) घेतल्याच्या प्रसंगी असे नामनिर्देशनपत्र अवैध होईल अशी त्याने नामनिर्देशनपत्रात तरतूद केली पाहिजे.

(८) ज्याच्या बाबतीत, पोटनियम (७) खंड (ब) अन्वये नामनिर्देशनपत्रात कोणतीही खास तरतूद करण्यात आलेली नाही अशा नामनिर्दिष्ट इसमाच्या मृत्यूनंतर लगेच किंवा त्या पोटनियमाच्या खंड (ब) अनुसार किंवा त्याच्या परंतुकानुसार ज्या कारणामुळे नामनिर्देशनपत्र अवैध होत असेल अशी कोणतीही घटना घडल्यावर, वर्गणीदाराने या नियमातील उपबंधानुसार तयार केलेले नामनिर्देशनपत्र रद्द करण्याविषयीची लेखी नोटीस लेखा अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे.

(९) वर्गणीदाराने तयार केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र आणि ते रद्द करण्याविषयीची त्याने दिलेली प्रत्येक नोटीस ही, ती वैध असेल तेथवर, लेखा अधिकाऱ्यास ती ज्या तारखेस मिळाली असेल त्या तारखेस अंमलात येईल.

### वर्गणीदाराचे लेखे

६. (१) प्रत्येक वर्गणीदाराच्या नावे लेखा तयार करण्यात आला पाहिजे आणि त्यामध्ये वर्गणीच्या रकमेवर नियम ११, पोटनियम (२) मध्ये विहित केल्याप्रमाणे संगणना केलेल्या व्याजासह वर्गणीची रक्कम दर्शविण्यात आली पाहिजे.

(२) विभागणी प्राप्त कर्मचाऱ्याच्या विभागणी प्राप्तीच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी तो कोणत्याही भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी देत असेल अशा निधीमध्ये त्याच्या लेख्यामध्ये ी रक्कम, (अशा भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याने जे अंशदान केले असेल ती रक्कम व वरील व्याज निधीमधील त्याच्या लेख्यात बदली करण्यात येईल.)].

**वर्गणीच्या शर्ती व दर**

(१) या नियमाच्या उपबंधास अधीन राहून, वर्गणीदाराने तो ज्या कालावधीत निलंबना- असेल, अशा कालावधीव्यतिरिक्त, प्रत्येक महिन्यास निधीमध्ये वर्गणीचा भरणा केला पाहिजे.

) जो निलंबनाखाली होता अशा वर्गणीदारास त्याच्या निलंबनाच्या कालावधीत त्यास जी देण्याचा हक्क होता अशा वर्गणीच्या किमान रकमेपेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही , सेवेतील पुनःस्थापनेनंतर एका रकमेत किंवा हप्त्याने देता येईल.

) वर्गणीदारास, सरासरी वेतनावरील रजा किंवा ३० दिवसांपेक्षा कमी असलेली अर्जित नसलेल्या कोणत्याही रजेच्या कालावधीत वर्गणीची रक्कम न देण्याविषयी ठरविता येईल त्याने केलेली अशी निवड, तो रजेवर जाण्यापूर्वी, त्याने कार्यालय प्रमुखास कळविली पाहिजे. आणि वेळेवर कळविण्यात झालेली कसुरी ही, अभिदान देण्याची निवड असल्याचे समजण्यात येईल. ा रीतीने केलेली निवड ही अंतिम असेल.

) ज्या वर्गणीदाराने, निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली रक्कम, नियम ३० अन्वये घेतली असेल अशा वर्गणीदाराने, रक्कम अशा रीतीने काढून घेतल्यानंतर, तो परत कामावर शिवाय त्याने निधीमध्ये वर्गणी भरता कामा नये.

(१) पुढील शर्तीस अधीन राहून, वर्गणीदाराने वर्गणीची रक्कम स्वतः ठरविली पाहिजे :—

(अ) वर्गणी पूर्ण रुपयांमध्ये दर्शविण्यात येईल ;

(ब) अशा रीतीने दर्शविण्यात आलेली वर्गणीची रक्कम ही, त्याच्या वित्तलब्धीच्या ६ क्यांपेक्षा कमी नसेल अशी आणि तो, राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही मंडळाच्या अंशदायी विष्यनिर्वाह निधीमध्ये पूर्वी ८⅓ टक्के या दराने वर्गणी देत असेल, त्या बाबतीत, त्याच्या तलब्धीच्या ८⅓ टक्क्यांपेक्षा कमी नसेल अशी आणि या दोन्ही बाबतीत त्याच्या एकूण त्तलब्धीपेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम असेल :

परंतु, चतुर्थ वर्ग कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, वर्गणीचा किमान दर हा दरमहा ४० रुपयांमध्ये; ी वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत २ रुपये आणि इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत रुपये ३ का असेल.

(क) ज्या बाबतीत, परिषद कर्मचारी यथास्थिती, ६ टक्के किंवा ८⅓ टक्के या किमान ाने वर्गणी देण्याची निवड करील, त्या बाबतीत, रुपयाचा कोणताही अपूर्णांक हा लगतपुढील र्णांकापर्यंत वाढविण्यात येईल, म्हणजेच ५० पैसे हे लगतपुढील पूर्ण रुपया म्हणून हिशेबात ण्यात येतील.

**निधी**

२) पोटनियम (१) च्या प्रयोजनासाठी, वर्गणीदाराच्या वित्तलब्धी—

(अ) अगोदरच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या वर्गणीदाराच्या बतीत, त्या तारखेस त्यास ज्या वित्तलब्धी मिळण्याचा हक्क होता, अशा वित्तलब्धी असतील :

परंतु,—

(एक) वर्गणीदार हा जर उक्त तारखेस रजेवर असेल आणि जर त्याने अशा रजेच्या कालावधीत वर्गणी न देण्याची निवड केली असेल किंवा तो जर उक्त तारखेस निलंबनाखाली

. दिनांक ६ मार्च १९७० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर करण्यात आला.



असेल तर, त्याच्या वित्तलब्धी ह्या, तो कामावर परत रुजू झाल्यानंतर पहिल्या दिवशी त्यास ज्या वित्तलब्धी मिळण्याचा हक्क असेल, अशा वित्तलब्धी असतील ; आणि

(दोन) वर्गणीदार उक्त तारखेस जर भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर असेल किंवा जर तो उक्त तारखेस रजेवर असेल आणि रजेवर असणे चालू ठेवील आणि जर त्याने अशा रजेच्या कालावधीत वर्गणी देण्याची निवड केली असेल तर, त्याच्या वित्तलब्धी ह्या, तो भारतामध्ये कामावर असता तर त्यास ज्या वित्तलब्धी मिळण्याचा हक्क प्राप्त झाला असता, अशा वित्तलब्धी असतील;

(ब) अगोदरच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी जिल्हा परिषदेच्या सेवेत नसलेल्या वर्गणीदाराच्या बाबतीत, तो निधीमध्ये सहभागी झाल्याच्या दिवशी त्यास ज्या वित्तलब्धी मिळण्याचा हक्क होता, अशा वित्तलब्धी असतील.

(३) वर्गणीदाराने प्रत्येक वर्षी आपली मासिक वर्गणीची रक्कम निश्चित करण्याबाबत पुढील रीतीने कळविले पाहिजे :—

(अ) जर तो अगोदरच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी कामावर असेल तर, प्रत्येक वर्षी १५ मार्चपूर्वी आपल्या आहरण अधिकाऱ्यास लेखी सूचना देऊन ;

(ब) जर तो अगोदरच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी रजेवर असेल आणि त्याने अशा रजेच्या कालावधीत वर्गणी न देण्याची निवड केली असेल किंवा त्या तारखेस तो निलंबनाखाली असेल तर, त्या वर्षाच्या १५ मार्चपूर्वी आपल्या आहरण अधिकाऱ्यास लेखी सूचना देऊन ;

(क) वर्षाच्या अवधीत जर त्याने जिल्हा परिषदेच्या सेवेत प्रथमतःच प्रवेश केला असेल तर, तो ज्या महिन्यात निधीमध्ये सहभागी होईल त्या महिन्याच्या १५ तारखेपूर्वी आपल्या आहरण अधिकाऱ्यास लेखी सूचना देऊन ;

(ड) जर तो अगोदरच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी रजेवर असेल आणि रजेवर असणे चालू ठेवील आणि जर त्याने अशा रजेच्या कालावधीत अभिदान देण्याची निवड केली असेल तर, त्या वर्षाच्या १५ मार्चपूर्वी आपल्या आहरण अधिकाऱ्यास लेखी सूचना देऊन ;

(इ) जर तो अगोदरच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी स्वीयेतर सेवेत असेल तर चालू वर्षाच्या एप्रिल महिन्याकरिता, त्याने, वर्गणीबद्दल कोषागारात जमा केलेली रक्कम ;

(४) [1][अशा रीतीने ठरविलेली वर्गणीची रक्कम वर्षामध्ये कोणत्याही वेळी एकदाच कमी करता येईल किंवा त्यात सबंध वर्षात दोनदा वाढ करता येईल :]

परंतु, वर्गणीदार हा जर, महिन्याच्या काही कालखंडात कामावर हजर असेल आणि त्या महिन्यातील उरलेल्या दिवसांत रजेवर असेल आणि जर त्याने रजेच्या कालावधीत वर्गणी न देण्याची निवड केली असेल तर, देय अशी वर्गणीची रक्कम ही, त्याने महिन्यात कामावर घालविलेल्या दिवसांच्या प्रमाणात असेल.

९. वर्गणीदाराची स्वीयेतर सेवेत बदली करण्यात आली असेल किंवा त्याला भारताबाहेर प्रतिनियुक्त करण्यात आले असेल त्या बाबतीत जणूकाही त्याची बदली किंवा प्रतिनियुक्ती करण्यात आली नाही असे समजून, त्याच रीतीने, तो निधीच्या नियमास अधीन असेल.

**वर्गणीची वसुली**

१०. (१) जिल्हा निधीतून वित्तलब्धी घेण्यात येत असतील त्या बाबतीत वित्तलब्धी दाखल वर्गणीची आणि आगाऊ रकमांच्या मुद्दलाची व व्याजाची वसुली ही वित्तलब्धीतूनच करण्यात येईल.

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

) जेव्हा दुसऱ्या कोणत्याही द्रव्यसाधनाद्वारे वित्तलब्धी घेण्यात येत असतील तेव्हा, वर्गणीदाराने देणे असलेली रक्कम प्रत्येक महिन्यात लेखा अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे.

) वर्गणीदार, त्यास ज्या तारखेपासून निधीत सहभागी होण्यास आवश्यक करण्यात आले अशा तारखेपासून किंवा नियम ७ मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त ल कोणत्याही महिन्यामध्ये किंवा महिन्यांमध्ये वर्गणी देण्यात कसूर करील तर, वर्गणीदाराने ११ मध्ये तरतूद केलेल्या दराने आकारलेल्या व्याजासह वर्गणीची थकबाकी म्हणून देय ी एकूण रक्कम, निधीमध्ये ताबडतोब दिली पाहिजे अथवा रक्कम देण्यात कसूर केल्यास या वित्तलब्धीमधून हप्त्याने वजावट करून रक्कम वसूल करावी असा आदेश लेखा अधिकाऱ्या- देण्यात येईल किंवा नियम १२, पोटनियम (१) खंड (क) अन्वये जी आगाऊ रक्कम करण्यासाठी खास कारणे आवश्यक असतात अशी रक्कम मंजूर करण्यास सक्षम असलेली ारी निदेश देईल अशा इतर रीतीने वसूल करण्यात येईल :

ु, ज्या वर्गणीदारांच्या निधीतील अनामत रकमांवर कोणतेही व्याज मिळत नाही, अशा ारांना कोणतेही व्याज देण्यास फर्माविता कामा नये.

व्याज

. "[1][ (१) पोटनियम (६) या उपबंधास अधीन राहून, प्रत्येक जिल्हा परिषद दरवर्षी, वर्गणी- ा लेख्यामध्ये, राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा दराने व्याजाची रक्कम जमा करील.]"

२) व्याज, प्रत्येक वर्षी दिनांक ३१ मार्चपासून पुढील पद्धतीने जमा करण्यात येईल :—

(एक) अगोदरच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेतून चालू र्षात काढून घेतलेली कोणतीही रक्कम वजा करून—बाकीच्या रकमेवर बारा महिन्यांचे व्याज ;

(दोन) चालू वर्षी काढलेल्या रकमांवर—चालू वर्षाच्या सुरुवातीपासून, ज्या महिन्यात क्कम काढली असेल त्या महिन्याच्या अगोदरच्या महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंतचे व्याज ;

(तीन) अगोदरच्या वर्षाच्या ३१ मार्चनंतर वर्गणीदाराच्या खाती जमा केलेल्या सर्व मांवर—रक्कम अनामत ठेवलेल्याच्या तारखेपासून चालू वर्षाच्या समाप्तीपर्यंतचे व्याज ;

(चार) व्याजाची एकूण रक्कम ही, लगतपुढील पूर्णांकापर्यंत वाढविण्यात येईल (पन्नास हे लगतपुढील पूर्ण रुपया म्हणून हिशेबात धरण्यात येतील) :

परंतु, वर्गणीदारांच्या खाती जमा असलेली रक्कम जेव्हा देय होत असेल तेव्हा त्यावरील ज, यथास्थिती चालू वर्षाच्या सुरुवातीपासून किंवा रक्कम अनामत ठेवलेल्याच्या तारखेपासून णीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम ज्या तारखेस देय होत असेल त्या तारखेपर्यंतच्या ावधीच्या संबंधातच केवळ या पोटनियमान्वये जमा करण्यात येईल.

) या नियमाच्या प्रयोजनाकरिता, रक्कम अनामत ठेवल्याची तारीख ही, वित्तलब्धीमधून वसूल करण्याच्या बाबतीत, ज्या महिन्यात त्यांची वसुली करण्यात आली असेल त्या महिन्याची तारीख असे मानण्यात येईल ; आणि वर्गणीदाराने पाठविलेल्या रकमेच्या बाबतीत, जर क्कम, लेखा अधिकाऱ्यास, त्या महिन्याच्या पाच तारखेपूर्वी मिळेल तर, अशी रक्कम ज्या त मिळेल त्या महिन्याची पहिली तारीख असे मानण्यात येईल ; परंतु अशी रक्कम जर हिन्याच्या पाच तारखेस किंवा पाच तारखेनंतर मिळाल्यास, लगतनंतरच्या महिन्याची पहिली असे मानण्यात येईल.

) वर्गणीदाराचा पगार किंवा रजा वेतन काढण्यामध्ये विलंब झाल्यामुळे कोणत्याही वर्गणीची करण्यामध्ये विलंब झाला असेल त्या बाबतीत, अशा वर्गणीवरील व्याज हे, ज्या महिन्यात

दिनांक ६ मार्च १९७० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर करण्यात आला.



असा पगार किंवा रजा वेतन काढले असेल असा महिना कोणताही असो, ज्या महिन्यात वर्गणी- दाराचा पगार किंवा रजा वेतन देय होत असेल अशा महिन्यापासून देण्यात येईल.

(५) (अ) नियम २६, २९, ३०, ३१ किंवा ३२ अन्वये द्यावयाच्या कोणत्याही रकमेच्या अतिरिक्त ज्या महिन्यात रक्कम देण्यात आली असेल अशा महिन्याच्या अगोदरच्या महिन्यांची मुदत संपेपर्यंतचे किंवा ज्या महिन्यात अशी रक्कम देय होत असेल अशा महिन्यानंतर सहा महिन्यांचे मुदत संपेपर्यंतचे त्यावरील व्याज हे, या दोहोंपैकी जी मुदत कमी असेल अशा मुदतीत, अशी रक्कम ज्या इसमास द्यावयाची असेल अशा इसमास देय असेल :

परंतु, लेखा अधिकारी ज्या तारखेस रोख रक्कम देण्यास तयार असेल किंवा त्या इसमास रक्कम चुकती करण्यासाठी त्याने डाकेने धनादेश पाठविला असेल अशी तारीख त्याने त्या इसमास (किंवा त्याच्या अभिकर्त्यास) कळविली असेल त्या बाबतीत, अशा रीतीने, यथास्थिती, कळविलेल्या तारखेपूर्वीच्या किंवा ज्या तारखेस धनादेश डाकेने पाठविला असेल त्या तारखेपूर्वीच्या महिना अखेरपर्यंतचे व्याज देण्यात येईल.

[1][टीप.—जर लेखा अधिकाऱ्याची स्वतःची अशी खात्री होईल की, वर्गणीदाराच्या आवाक्या- बाहेरील परिस्थितीमुळे पैसे भरण्यास उशीर झाला, तर त्या बाबतीत, त्यास शिल्लक निधीवरील व्याजाचा भरणा हा सहा महिन्यांच्या कालावधीनंतर, परंतु एक वर्षापर्यंत करण्यास प्राधिकृत करता येईल आणि अशा प्रत्येक प्रकरणी, त्या बाबतीत झालेल्या प्रशासनाच्या विलंबाचा पूर्णपणे तपास करण्यात येईल आणि कार्यवाही, कोणतीही असल्यास, करण्यात येईल.] ;

(ब) अस्थायी पद धारण करणारा वर्गणीदार आपल्या नावे साठलेली रक्कम निधीमध्ये ठेवण्याबद्दल नियम २९ अन्वये परवानगी दिलेल्या विकल्पाची निवड आपल्या पदाची समाप्ती झाल्यावर करील तर, त्या रकमेवर, सेवासमाप्तीनंतर सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीकरिता व्याज दिले जाईल, आणि जर तो जिल्हा परिषदेखाली पुनर्नियुक्ती मिळवील तर, जी अनामत रक्कम काढण्यात आली नसेल त्यावर, ज्या तारखेस वर्गणीचे नवीकरण करण्यात आले असेल अशा तारखेपासून पुन्हा व्याज मिळू लागेल.

(६) वर्गणीदाराने आपणास व्याज घेण्याची इच्छा नसल्याचे लेखा अधिकाऱ्यास कळविले तर त्याच्या खाती व्याज जमा करण्यात येणार नाही, मात्र जर तो नंतर व्याजाची मागणी करील तर, ज्या वित्तीय वर्षी तो तशी मागणी करील अशा वित्तीय वर्षाच्या पहिल्या तारखेपासून त्याच्या खाती ते जमा करण्यात येईल.

(७) रकमांवरील जे व्याज, नियम १० च्या पोटनियम (३), [2][* * *] नियम २९ किंवा नियम ३०, या अन्वये निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती पुन्हा जमा केले असेल त्या व्याजाची पोटनियम (१) अन्वये विहित करण्यात येईल अशा दराने आणि शक्य असेल तेथवर या नियमात वर्णन केलेल्या रीतीने संगणना करण्यात येईल.

निधीमधून आगाऊ रकमा

१२. (१) पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्यांच्या स्वविवेकाने, निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेतून पुढील शर्तीवर, त्यास तात्पुरती आगाऊ रक्कम देता येईल :—

(अ) वर्गणीदाराच्या आर्थिक परिस्थितीमुळे अशी रक्कम देणे उचित आहे आणि ती पुढील प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनासाठी खर्च करण्यात येईल आणि त्या व्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

केली जाणार नाही अशी, रकमा मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याची खात्री झाल्याशिवाय, गतीही आगाऊ रक्कम देण्यात येणार नाही :—

(एक) आजारपण किंवा प्रसूतावस्था यासंबंधात जरूर असेल तेथे, वर्गणीदाराच्या [1][आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या] किंवा त्यावर प्रत्यक्षपणे अवलंबून असलेल्या कोणत्याही इसमाचा प्रवास खर्च धरून, खर्च देण्यासाठी;

(दोन) जरूर असेल तेथे, वर्गणीदाराच्या [1][आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या] किंवा पुढील बाबतीत त्याच्यावर प्रत्यक्षपणे अवलंबून असलेल्या कोणत्याही इसमाचा प्रवास खर्च धरून, उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी—

(अ) भारताबाहेर, माध्यमिक शिक्षणानंतरच्या पुढील शैक्षणिक, तांत्रिक, व्यावसायिक पाठ्यक्रमासंबंधी शिक्षण घेण्याकरिता, आणि

(ब) भारतामध्ये माध्यमिक शिक्षणानंतरच्या कोणत्याही वैद्यकीय, अभि[illegible] किंवा इतर तांत्रिक किंवा विशेषीकृत पाठ्यक्रमाकरिता, परंतु असा पाठ्यक्रम [illegible] वर्षांहून कमी कालावधीचा असता कामा नये ;

(तीन) वर्गणीदारास बांधील खर्च आणि स्वतःच्या किंवा आपल्या मुलांच्या किंवा आपल्यावर प्रत्यक्षपणे अवलंबून असलेल्या इतर कोणत्याही इसमाच्या विवाहासाठी किंवा इतर समारंभासाठी रूढीपरिपाठानुसार त्याच्या दर्जास उचित असा करावा लागणारा खर्च देण्याकरिता :

परंतु, प्रत्यक्षपणे अवलंबून असण्याबाबतची शर्त वर्गणीदाराच्या मुलाच्या किंवा मुलीच्या बाबतीत लागू असणार नाही.

आणखी असे की, वर्गणीदाराच्या मातापितरांच्या अंत्यसंस्काराबाबतचा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या आगाऊ रकमेच्या बाबतीत, प्रत्यक्षपणे अवलंबून असण्याबाबतची शर्त लागू असणार नाही.

(चार) आपली अधिकृत कर्तव्ये पार पाडीत असताना केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्यासंबंधी आपल्याविरुद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही अभिकथनाच्या संबंधात स्वतःच्या भूमिकेचे समर्थन करण्याकरिता वर्गणीदाराने दाखल केलेल्या वैध कार्यवाहीचा खर्च भागविण्याकरिता ; अशा प्रकरणात दिली जाणारी आगाऊ रक्कम, जिल्हा परिषदेकडून त्याच प्रयोजनार्थ अन्य कोणत्याही मार्गाने अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही आगाऊ रकमेच्या अतिरिक्त असेल :

परंतु, त्याच्या अधिकृत कर्तव्यांशी संबंधित नसलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी किंवा त्याच्यावर लादलेल्या सेवेच्या कोणत्याही शर्तीच्या अथवा शास्तीसंबंधी जिल्हा परिषदेविरुद्ध कोणत्याही न्यायालयात वैध कार्यवाही सुरू करणाऱ्या वर्गणीदाराला या उप खंडाखालील आगाऊ रक्कम अनुज्ञेय असणार नाही.

(पाच) कोणत्याही न्यायालयात वर्गणीदारावर खटला भरण्यात आला असेल त्या बाबतीत किंवा त्याच्याकडून कार्यालयीन कामात कोणतीही गैरवर्तणूक घडली असल्याचे अभिकथित करण्यात आलेल्या प्रकरणाच्या चौकशीसंबंधात स्वतःचा बचाव करण्यासाठी वर्गणीदाराने एखादा विधि व्यवसायी नेमला असेल त्या बाबतीत बचावाचा खर्च भागविण्याकरिता;

(सहा) त्याची अधिकृत कर्तव्ये पार पाडण्यासंबंधीच्या कोणत्याही बाबीसंबंधी वर्गणीदाराविरुद्ध खाजगी पक्षकाराने दाखल केलेल्या कोणत्याही वैध कार्यवाहीचा खर्च भागविण्याकरिता.

1. दिनांक १ जून, १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
. किता.



(ब) मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याने आगाऊ रक्कम देण्यासंबंधीची आपली कारणे लेखी नमूद केली पाहिजेत.

(क) विशेष कारणांखेरीज आगाऊ रक्कम ही—

(एक) तीन महिन्यांचे वेतन (महागाई वेतन वगळून) किंवा वर्गणीदाराच्या नावे निधीमध्ये जमा असलेल्या रकमेच्या निम्मी रक्कम यांपैकी जी कमी असेल त्याहून अधिक होता कामा नये ; किंवा

(दोन) अगोदरच आगाऊ दिलेली रक्कम उप खंड (एक) खाली अनुज्ञेय असलेल्या रकमेच्या दोन-तृतीयांशाहून अधिक होत नसल्यास पूर्वीच्या सर्व आगाऊ रकमांचा [1][* * *] अंतिम भरणा झाल्यानंतर कमीत कमी तीन महिन्यांपर्यंत देण्यात येऊ नये :

परंतु, कारण गोपनीय स्वरूपाचे असेल तर लेखा अधिकाऱ्याकडे ते व्यक्तिशः व गुप्तपणे कळविता येईल;

(ड) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी खंड (अ) च्या उप खंड (चार), (पाच) किंवा (सहा) मध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी मंजूर करावयाची आगाऊ रक्कम तीन महिन्यांचे वेतन किंवा ५०० रुपये, यांपैकी जी अधिक असेल, त्या रकमेहून अधिक असता कामा नये आणि कोणत्याही बाबतीत ती वर्गणीदाराच्या नावे जमा असलेल्या रकमेच्या निम्म्याहून अधिक होता कामा नये.

[2][ (ई) कोणत्याही पूर्वीच्या आगाऊ रकमेच्या शेवटच्या हप्त्याची परतफेड करण्यापूर्वी पोटनियम (१), खंड (क) अन्वये एखादी आगाऊ रक्कम मंजूर करण्यात आली असेल त्या बाबतीत, कोणत्याही पूर्वीच्या आगाऊ रकमेची वसूल न झालेली शिल्लक, ही अशा मंजूर केलेल्या आगाऊ रकमेत मिळवण्यात येईल आणि त्या एकत्रित रकमेनुसार वसुलीचे हप्ते ठरविण्यात येतील.] ;

[3][ (१-अ) पोटनियम (१), खंड (क) मध्ये घालून दिलेल्या शर्तीस अधीन राहून, मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याची अशी खात्री होईल की, संबंधित वर्गणीदारास पोट नियम (१), खंड (अ) मध्ये नमूद केलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी आगाऊ रकमेची आवश्यकता आहे तर त्यास विशेष परिस्थितीत कोणत्याही वर्गणीदारास आगाऊ रक्कम देण्यास मंजुरी देता येईल.].

(२) आगाऊ रक्कम ठरविताना, मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याने वर्गणीदाराच्या नावे निधीमध्ये जमा असलेली रक्कम ध्यानात घेतली पाहिजे.

(३) (अ) पोटनियम (१) च्या खंड (क) अन्वये ज्या आगाऊ रकमेच्या मंजुरीसाठी विशेष कारणांची आवश्यकता नसेल, ती, त्या कार्यालयाच्या आस्थापनेच्या प्रभारी राजपत्रित अधिकाऱ्यास मंजूर करता येईल.

(ब) पोटनियम (१) च्या खंड (क) अन्वये ज्या आगाऊ रकमेच्या मंजुरीसाठी विशेष कारणांची आवश्यकता असेल, ती रक्कम पुढील तक्त्यात स्तंभ (१) खाली नमूद केलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्यासमोर स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांना मंजूर करता येईल :—

तक्ता

| वर्गणीदार (१) | प्राधिकारी (२) |
|---|---|
| एक. पंचायत समितीच्या अधीन काम करणारा जिल्हा परिषदेचा कर्मचारी. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| दोन. जिल्हा परिषदेचा अन्य कोणताही कर्मचारी | जिल्हा परिषदेचा विभाग प्रमुख : |

1. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.
2. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
3. वरील अधिसूचनेद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, कोणत्याही विशिष्ट बाबतीत स्तंभ (२) मध्ये नमूद केलेला प्राधिकारी हाच ज्या आगाऊ रकमेच्या मंजुरीसाठी पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये विशेष कारणांची आवश्यकता नसेल अशी रक्कम मंजूर करण्यात सक्षम असा प्राधिकारी असेल त्या बाबतीत, उक्त आगाऊ रक्कम मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने मंजूर केली पाहिजे.

१३. (१) मंजुरी देणारा प्राधिकारी निदेश देईल इतक्या समान मासिक हप्त्यांमध्ये वर्गणीदाराकडून आगाऊ रक्कम वसूल करण्यात येईल ; परंतु वर्गणीदाराने बारा महिन्यांपेक्षा कमी हप्त्यांत निवड दर्शविली नसेल तर हप्त्यांची संख्या बाराहून कमी असणार नाही व चोवीसपेक्षा अधिक असणार नाही. नियम १२ च्या पोटनियम (१) च्या खंड (क) अन्वये वर्गणीदाराच्या तीन महिन्यांच्या वेतनाहून आगाऊ रक्कम अधिक होत असेल अशा विशिष्ट प्रकरणांच्या बाबतीत मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्यास उक्त हप्त्यांची संख्या चोवीसहून अधिक ठरविता येईल; परंतु कोणत्याही बाबतीत ती छत्तीसहून अधिक असणार नाही. वर्गणीदारास स्वतःच्या विकल्पानुसार एका महिन्यात एकाहून अधिक हप्ते भरता येतील. अशा प्रकारे हप्ते ठरविणे शक्य व्हावे यासाठी आवश्यक असल्यास, आगाऊ रक्कम वाढविण्यात किंवा कमी करण्यात येत असल्यामुळे प्रत्येक हप्ता पूर्ण रुपयांमध्ये असला पाहिजे.

(२) वर्गणीची वसुली करण्यासाठी नियम १० मध्ये विहित केलेल्या रीतीने वसुली करण्यात येईल व आगाऊ रक्कम ज्या महिन्यात घेण्यात आली असेल त्या महिन्यानंतरच्या महिन्याच्या वेतनाच्या वाटपापासून वसुलीस सुरुवात झाली पाहिजे. वर्गणीदारास निर्वाह अनुदान मिळत असल्यास किंवा तो सरासरी वेतनावर मिळणाऱ्या रजेखेरीज अन्य रजेवर किंवा यथास्थिती एक महिन्याहून किंवा ३० दिवसांच्या अवधीपेक्षा कमी दिवसांच्या अर्जित रजेवर असल्यास त्याच्या संमतिवाचून वसुली करण्यात येता कामा नये. वर्गणीदारास वेतनाची आगाऊ दिलेली रक्कम वसूल करण्यात येत असेल त्यावेळी वर्गणीदाराने लेखी विनंती केल्यानंतर, मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्यास (निधीतील रकमेची) वसुली पुढे ढकलता येईल.

[1][* * *]

(५) वर्गणीदारास आगाऊ रक्कम मंजूर होऊन त्याने ती घेतल्यानंतर परतफेड पूर्ण होण्यापूर्वी ती नामंजूर करण्यात आल्यास, काढलेल्या पूर्ण रकमेची किंवा तिच्या शिल्लक रकमेची [2][* * *] ताबडतोब परतफेड करण्यात आली पाहिजे, किंवा त्यात कसूर झाल्यास, लेखा अधिकारी, वर्गणीदाराच्या वितलब्धीमधून एकरकमी किंवा नियम १२ च्या पोटनियम (१) च्या खंड (क) अन्वये ज्या आगाऊ रकमेच्या मंजुरीसाठी विशेष कारणांची आवश्यकता असेल अशी रक्कम मंजूर करण्यासाठी सक्षम असा प्राधिकारी निदेश देईल अशा परंतु बाराहून अधिक नसतील अशा मासिक हप्त्यांमधून कापून घेऊन ती वसूल करण्याचा आदेश देईल;

[3][* * *]

(६) या नियमान्वये केलेल्या वसुलीच्या रकमा, निधीमध्ये वर्गणीदाराच्या नावे त्या ज्याप्रमाणे जमा करण्यात येतात, त्याचप्रमाणे जमा करण्यात येतील.

**विमापत्रांसाठी पैसे भरणे**

१४. यापुढे नियम १६ ते २४ यांमध्ये समाविष्ट असलेल्या शर्तींच्या अधीन,—

(अ) आयुर्विमापत्राच्या संबंधात देणे असलेल्या रकमा ह्या, निधीस देणे असलेल्या वर्गणीच्या ऐवजी, वर्गणीदाराच्या इच्छेनुसार पूर्णत: किंवा अंशत: देता येतील;

(ब) निधीमध्ये वर्गणीदाराच्या नावे असलेल्या वर्गणीच्या रकमा व त्यावरील व्याज—

(एक) आयुर्विमापत्राचे पैसे भरण्यासाठी,

---

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.
२. कित्ता.
३. कित्ता.



(दोन) विमापत्राच्या एकरकमी खरेदीसाठी;

काढता येईल :

[1][परंतु असे की,—

(१) प्रस्तावित विमापत्राचा तपशील लेखा अधिकाऱ्यास सादर करण्यापूर्वी आणि त्याने ती बरोबर असल्याचे मान्य करण्यापूर्वी, किंवा

(२) रक्कम काढण्यासाठी अर्ज केल्याच्या किंवा मागणी सादर केल्याच्या तारखेला, तीन महिन्यांहून जास्त असलेल्या मुदतीपूर्वी कोणत्याही देणे असलेल्या रकमेच्या किंवा केलेल्या खरेदीच्या भरपाईसाठी, किंवा

(३) पैसे भरण्याच्या ठराविक तारखेपूर्वी, तीन महिन्यांहून अधिक अगोदर कोणताही हप्ता किंवा वर्गणी देण्यासाठी

कोणतीही रक्कम काढण्यात येणार नाही.

स्पष्टीकरण.—या परंतुकाच्या प्रयोजनाकरिता, भरणा करण्याची ठराविक तारीख म्हणजे भारतीय आयुर्विमा महामंडळाने मान्यता दिलेल्या अधिक कालावधीसह ज्या तारखेपर्यंत भरणा करता येईल ती तारीख आणि पैसे भरल्याचे चिन्ह (टोकन) म्हणून हप्त्याची पावती सादर केल्याशिवाय भरण्याच्या ठराविक तारखेनंतर कोणतीही रक्कम काढण्यास परवानगी देण्यात येणार नाही.]

तसेच एखाद्या शैक्षणिक दान विमापत्राचा भरणा निधीतील वर्गणी देण्याऐवजी करता येणार नाही आणि असे विमापत्र वर्गणीदाराच्या सामान्य नियत वयोमानाच्या पूर्वी पूर्णत: किंवा अंशत: पैसे परत मिळण्यास देय असेल तर, अशा विमापत्राच्या संबंधातील कोणताही भरणा किंवा खरेदी करण्यासाठी कोणतीही रक्कम काढता येणार नाही;

आणखी असे की, काढण्यात येणारी रक्कम रुपयाच्या निकटतम पूर्णांकापर्यंत पूर्ण करण्यात आली पाहिजे (पन्नास पैसे हे पुढील पूर्ण रुपया म्हणून मोजण्यात येतील).

१५. (१) नियम १४ अन्वये ज्या विमापत्रांबाबत त्यांचे पैसे हे निधीस देय असलेल्या वर्गणीऐवजी त्याकडे देण्यास किंवा रक्कम निधीमधून काढण्यास परवानगी देता येते अशा विमापत्रांची संख्या चारांहून अधिक असणार नाही :

परंतु, नियत दिवसाच्या लगतपूर्वी एखाद्या नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यास चाराहून अधिक विमापत्रांकरिता, राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही मंडळाच्या सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीस देय असलेल्या वर्गणीऐवजी पैसे भरण्यास किंवा राज्य शासनाच्या किंवा मंडळाच्या सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीमधून पैसे काढण्यास परवानगी देण्यात आली असेल तर, अशा विमापत्रांच्या संबंधी अशा प्रकारे वर्गणीऐवजी पैसे भरण्यास किंवा विमापत्रासाठी निधीतून पैसे काढण्यास परवानगी असणे चालू राहील.

(२) नियम १४ अन्वये ज्या विमापत्रांच्यासंबंधी निधीतून रक्कम काढण्यास परवानगी देता येईल अशा विमापत्रांकरिता वार्षिक हप्त्याखेरीज अन्यप्रकारे हप्ता भरला जाणार नाही.

स्पष्टीकरण.—पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या जास्तीत जास्त विमापत्रांची संगणना करताना, मुदत संपलेल्या किंवा परिदत्त (पेड-अप) विमापत्रांमध्ये परिवर्तित करण्यात आलेली विमापत्रे त्यामधून वगळण्यात आली पाहिजेत.

१६. (१) निधीस देय असलेल्या रकमेऐवजी नियम १४ च्या खंड (अ) अन्वये द्यावयाची कोणतीही एकूण रक्कम नियम ८ च्या पोटनियम (१) अन्वये निधीस देय असलेल्या किमान

---

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

वर्गणीच्या रकमेहून कमी असेल तर, तफावतीची रक्कम नियम ११च्या पोटनियम (२) च्या खंड (चार) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने निकटतम पूर्ण रुपयापर्यंत पूर्ण करण्यात येईल आणि वर्गणीदार ती वर्गणी म्हणून निधीस देईल.

(२) नियम १४ च्या खंड (ब) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी वर्गणीदाराने आपल्या नावे जमा असलेल्या रकमेतून पैसे काढून घेतले तर त्यास, त्या नियमाच्या खंड (अ) खालील आपल्या विकल्पानुसार नियम ८ अन्वये निधीस देण्याजोगी वर्गणी देणे चालू ठेवता येईल.

१७. (१) नियम १४ च्या खंड (अ) अन्वये निधीस देय असलेल्या रकमेऐवजी विमापत्राचे पैसे देण्याची एखाद्या वर्गणीदाराची इच्छा असल्यास, निधीतील वर्गणीमध्ये त्यानुसार त्यास कपात करता येईल :

परंतु, वर्गणीदाराने—

(अ) आपल्या वेतनाच्या बिलावर किंवा पत्राने, लेखा अधिकाऱ्यास, कपातीबद्दलची वस्तुस्थिती व त्याचे कारण कळविले पाहिजे ;

(ब) वर्गणीमध्ये जितक्या रकमेची कपात करण्यात आलेली आहे ती रक्कम नियम १४च्या खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी योग्य रीत्या वापरण्यात आली असल्याबद्दल लेखा अधिकाऱ्याची खात्री पटविण्यासाठी, लेखा अधिकारी फर्मावील अशा मुदतीत, लेखा अधिकाऱ्यास पावत्या किंवा पावत्यांच्या प्रमाणित प्रती पाठविल्या पाहिजेत.

(२) नियम १४ च्या खंड (ब) अन्वये कोणतीही रक्कम काढून घेण्याची इच्छा असलेल्या वर्गणीदाराने—

(अ) पैसे काढून घेण्याबद्दलचे कारण लेखा अधिकाऱ्यास लेखी कळविले पाहिजे;

(ब) पैसे काढून घेण्याबद्दल लेखा अधिकाऱ्याकडे व्यवस्था केली पाहिजे;

(क) काढून घेण्यात आलेली रक्कम नियम १४ च्या खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी योग्य रीत्या वापरण्यात आली असल्याबद्दल लेखा अधिकाऱ्याची खात्री पटविण्यासाठी, लेखा अधिकारी फर्मावील अशा मुदतीत, लेखा अधिकाऱ्यास पावत्या किंवा पावत्यांच्या प्रमाणित प्रती पाठविल्या पाहिजेत.

(३) जितक्या रकमेने वर्गणीत कपात करण्यात आली असेल अशा कोणत्याही रकमेबाबत किंवा काढण्यात आलेल्या कोणत्याही रकमेबाबत पोटनियम (१) च्या खंड (ब) नुसार व पोटनियम (२) च्या खंड (क) नुसार आवश्यक असलेल्या रीतीप्रमाणे लेखा अधिकाऱ्याची खात्री पटली नसेल तर, लेखा अधिकारी [1][* * * *] वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून त्या रकमेपर्यंतची कोणती रक्कम वसूल करण्याचा व ती निधीमध्ये वर्गणीदाराच्या नावे जमा करण्याचा आदेश देईल.

१८. (१) जिल्हा परिषद वर्गणीदाराच्या वतीने महामंडळास पैसे भरणार नाही किंवा विमापत्र चालू ठेवण्यासाठी उपाययोजना करणार नाही.

(२) या नियमान्वये ग्राह्य असलेले विमापत्र म्हणजे, वर्गणीदाराने खुद्द स्वतःच्या आयुष्याचे काढलेले विमापत्र असेल आणि (ते विमापत्र पुरुष वर्गणीदाराने काढलेले असून वर्गणीदाराच्या पत्नीच्या किंवा पत्नीच्या आणि मुलांच्या किंवा त्यांपैकी कोणाच्याही फायद्यासाठी असल्याबद्दल त्यावर स्पष्टपणे नमूद केलेले नसल्यास) वर्गणीदारास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास वैध रीत्या अभिहस्तांकित करता येईल अशा प्रकारचे असेल.

स्पष्टीकरण १.—वर्गणीदार व त्याची पत्नी किंवा स्त्री वर्गणीदार व तिचा पती यांचे संयुक्त आयुर्विमापत्र, या पोटनियमाच्या प्रयोजनाकरिता वर्गणीदाराचे आयुर्विमापत्र असल्याचे मानण्यात येईल.

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

स्पष्टीकरण २.—वर्गणीदाराच्या पत्नीस अभिहस्तांकित करण्यात आलेले विमापत्र, प्रथम वर्गणीदाराच्या नावे पुन्हा अभिहस्तांकित करण्यात आले नसेल तर किंवा वर्गणीदार व त्याची पत्नी यांच्या नावे संयुक्त समुचित अभिहस्तांकन झालेले नसेल तर, स्वीकारले जाता कामा नये.

(३) विमापत्र वर्गणीदाराच्या पत्नीच्या किंवा वर्गणीदार स्त्रीच्या पतीच्या किंवा वर्गणीदाराची पत्नी किंवा वर्गणीदार स्त्रीचा पती आणि त्याची/तिची मुले किंवा त्यांपैकी कोणाच्याही व्यतिरिक्त कोणत्याही हिताधिकाऱ्याच्या लाभासाठी काढण्यात येणार नाही.

१९. (१) विमापत्राच्या संबंधात, वर्गणीचा प्रथम भरणा थांबविल्यापासून किंवा निधीतून प्रथमतः रक्कम काढल्यापासून, सहा महिन्यांच्या आत—

(अ) ते विमापत्र पुरुष वर्गणीदाराने काढलेले असून ते वर्गणीदाराच्या पत्नीच्या किंवा त्याच्या पत्नीच्या आणि मुलांच्या किंवा त्यांपैकी कोणाच्याही लाभासाठी असल्याबद्दल त्यावर स्पष्ट नमूद केलेले नसल्यास, नियम २३ अन्वये निधीस देय होणाऱ्या कोणत्याही रकमेचा भरणा होण्यासाठी जमानत म्हणून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास अभिहस्तांकित करण्यात आले पाहिजे आणि विमापत्र वर्गणीदाराच्या आयुर्विम्यासंबंधी किंवा वर्गणीदाराच्या आणि वर्गणीदाराच्या पत्नीच्या किंवा पत्नीच्या संयुक्त आयुर्विम्यासंबंधी असेल त्यानुसार किंवा उक्त विमापत्र पूर्वी वर्गणीदाराच्या पत्नीस अभिहस्तांकित करण्यात आले असेल त्यानुसार, दुसऱ्या अनुसूचीतील नमुन्यामधील नमुना (१) किंवा नमुना (२) किंवा नमुना (३) मध्ये विमापत्रावर पृष्ठांकित करून अभिहस्तांकन केल्यावर, लेखा अधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे.

(ब) ते विमापत्र पुरुष वर्गणीदाराने काढलेले असून वर्गणीदाराच्या पत्नीच्या किंवा त्याच्या पत्नीच्या आणि मुलांच्या किंवा त्यांपैकी कोणाच्याही लाभासाठी असल्याबद्दल त्यावर स्पष्ट नमूद केलेले असेल तर, ते लेखा अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आले पाहिजे.

(२) लेखा अधिकाऱ्याने शक्य असेल त्या बाबतीत महामंडळाकडे निर्देश करून विमापत्राबाबत पूर्वीचे अभिहस्तांकन अस्तित्वात नसल्याबद्दल स्वतःची खात्री करून घेतली पाहिजे.

(३) विमापत्राचे पैसे निधीतून देण्याच्या प्रयोजनार्थ लेखा अधिकाऱ्याने एखादे विमापत्र ग्राह्य ठरविल्यानंतर, विमापत्राच्या शर्तींमध्ये फेरफार करता येणार नाही किंवा लेखा अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीवाचून दुसऱ्या विमापत्राबरोबर त्याची अदलाबदल, लेखा अधिकाऱ्यास अशी अदलाबदल करण्यासंबंधीचा किंवा नव्या विमापत्राचा तपशील सादर केल्याखेरीज, करता येणार नाही.

(४) विमापत्र अभिहस्तांकित केले नसेल व पाठविले नसेल किंवा उक्त सहा महिन्यांच्या मुदतीत पाठविले असेल तर, त्या विमापत्राच्या संबंधात निधीस देय असलेली जी रक्कम भरण्याचे थांबविले असेल किंवा निधीतून जी रक्कम काढण्यात आली असेल, ती रक्कम, वर्गणीदाराने [1][* * * *] निधीमध्ये यथास्थिती तात्काळ भरली पाहिजे किंवा परत केली पाहिजे, किंवा त्यात कसूर झाल्यास ती रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीतून, नियम १२ च्या पोटनियम (१) या खंड (क) अन्वये ज्या आगाऊ रकमांच्या मंजुरीसाठी विशेष कारणे आवश्यक असतात अशा आगाऊ रकमा मंजूर करण्यासाठी समक्ष असलेला प्राधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे, हप्त्याने किंवा अन्यथा, वसूल करण्यात यावी असा आदेश लेखा अधिकाऱ्याने दिला पाहिजे.

(५) विमापत्राच्या अभिहस्तांकनाची नोटीस वर्गणीदाराने महामंडळास दिली पाहिजे आणि अभिहस्तांकनाची नोटीस पोचल्याची महामंडळाने दिलेली पोच अभिहस्तांकनाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत लेखा अधिकाऱ्यास पाठविली पाहिजे.

२०. विमापत्राची मुदत चालू असताना विमापत्राच्या शर्तीनुसार वर्गणीदाराने जो अधिलाभांश घेणे वैकल्पिक असेल असा कोणताही अधिलाभांश अशा विमापत्राची मुदत चालू असताना त्याने घेता कामा नये आणि विमापत्राची मुदत चालू असताना विमापत्राच्या शर्तीनुसार जो अधिलाभांश

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

ण्यासाठी वर्गणीदारास परावृत्त करणारा कोणताही विकल्प नसेल अशा कोणत्याही अधिलाभांशाची रक्कम वर्गणीदाराने निधीमध्ये भरली पाहिजे किंवा त्याने कसूर केल्यास त्याच्या वेतनलब्धीमधून हप्त्यांनी किंवा अन्यथा, नियम १२, पोटनियम (१), खंड (क) अन्वये जी आगाऊ रक्कम मंजूर करण्यासाठी विशेष कारणे आवश्यक असतात अशी आगाऊ रक्कम मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून निदेश देण्यात येईल त्याप्रमाणे कपात करून वसूल करण्यात आली पाहिजे.

२१. (१) नियम २४ अन्वये तरतूद करण्यात आली असेल, त्याखेरीज—

(अ) वर्गणीदार नोकरी सोडून गेला असेल तेव्हा; किंवा

(ब) तो सेवानिवृत्तिपूर्व रजेवर गेलेला असून विमापत्राच्या पुनर्अभिहस्तांकनाबद्दल किंवा विमापत्र परत करण्याबद्दल त्याने लेखा अधिकाऱ्यास अर्ज केला असल्यास, किंवा

(क) वर्गणीदार रजेवर असताना सेवानिवृत्त होण्यास त्यास परवानगी देण्यात आली असेल किंवा सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने त्याला पुढील सेवेसाठी अयोग्य ठरविले असेल व त्याने लेखा अधिकाऱ्यास विमापत्राच्या पुनर्अभिहस्तांकनाबद्दल किंवा ते परत मिळण्याबद्दल अर्ज केला असल्यास; किंवा

(ड) नियम १४ च्या खंड (अ) मध्ये आणि नियम १४ च्या खंड (ब) च्या उप खंड (एक) व (दोन) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरिता निधीमध्ये देणे असलेली जी रक्कम थांबविली असेल किंवा निधीतून जी कोणतीही रक्कम काढली असेल अशी रक्कम वर्गणीदार हा, [1][* * * *] पूर्णपणे देईल किंवा परत करील तर;

लेखाधिकाऱ्याने—

(एक) नियम १९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास विमापत्र अभिहस्तांकित केले असल्यास विमापत्र, तृतीय अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुना (१) मध्ये वर्गणीदारास किंवा यथास्थिती, वर्गणीदार व संयुक्त विमेदारास पुनर्अभिहस्तांकित केले पाहिजे आणि पुनर्अभिहस्तांकनाबद्दल महामंडळास उद्देशून लिहिलेल्या नोटिशीवर सही करून विमापत्र वर्गणीदारास हस्तांतरित केले पाहिजे.

(दोन) नियम १९ च्या पोटनियम (१) च्या खंड (ब) अन्वये विमापत्र त्यास पाठविण्यात आले असल्यास, विमापत्र वर्गणीदारास हस्तांतरित केले पाहिजे:

परंतु, वर्गणीदार हा, सेवानिवृत्तिपूर्व रजेवर गेल्यानंतर किंवा रजेवर असताना त्यास सेवानिवृत्त होण्यास परवानगी देण्यात आल्यानंतर किंवा सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने पुढील सेवेसाठी त्याला अयोग्य ठरविण्यात आल्यानंतर सेवेवर परत रुजू झाल्यास, अशाप्रकारे पुनर्अभिहस्तांकन केलेले किंवा हस्तांतरित केलेले कोणतेही विमापत्र, कोणत्याही प्रकारे त्याची मुदत पूर्ण झालेली नसल्यास किंवा ते अभिहस्तांकित केलेले नसल्यास किंवा त्याच्यावर काही आकारणी केलेली नसल्यास किंवा ते भारग्रस्त नसल्यास, यथास्थिती, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास पुन्हा अभिहस्तांकन करण्यात येऊन लेखा अधिकाऱ्यास पाठविण्यात आले पाहिजे किंवा नियम १९ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने लेखा अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आले पाहिजे, आणि त्यानंतर या नियमांचे उपबंध, शक्य असेल तेथवर, विमापत्राच्या संबंधात लागू होतील.

तसेच, विमापत्राची मुदत पूर्ण झालेली असल्यास किंवा ते कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित किंवा त्याच्यावर कोणतीही आकारणी केलेली असल्यास किंवा भारग्रस्त असल्यास, विमापत्राचे अभिहस्तांकन व ते पाठविणे त्यांच्या कसुरीस लागू असलेल्या नियम १९ च्या पोटनियम (४) च्या तरतुदी लागू होतील.

---

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.



(२) नियम २४ मध्ये उपबंधित असेल त्याखेरीज, सेवेतून बाहेर पडण्यापूर्वी वर्गणीदार मरण पावल्यास, लेखा अधिकाऱ्याने—

(एक) विमापत्र, नियम १९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास अभिहस्तांकित करण्यात आल्यास, ते स्वीकारण्यास वैध रीत्या हक्कदार असलेल्या इसमास, तृतीय अनुसूचीमध्ये मांडलेल्या नमुना (२) मध्ये विमापत्राचे पुनर्अभिहस्तांकन केले पाहिजे आणि पुनर्अभिहस्तांकनाबद्दल महामंडळास उद्देशून लिहिलेल्या नोटिशीवर सही करून त्यासह विमापत्र अशा इसमाकडे हस्तांतरित केले पाहिजे;

(दोन) नियम १९, पोटनियम (१) च्या खंड (ब) अन्वये त्याला विमापत्र देण्यात आले असल्यास, हिताधिकाऱ्याकडे किंवा हिताधिकारी नसल्यास वैध रीत्या ते स्वीकारण्यास हक्कदार असेल अशा इसमाकडे हस्तांतरित केले पाहिजे.

२२. (१) नियम १९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अभिहस्तांकित केलेल्या एखाद्या विमापत्राची मुदत, वर्गणीदाराने सेवा सोडण्यापूर्वी समाप्त होत असेल तर, किंवा वर्गणीदार व वर्गणीदाराची पत्नी किंवा तिचा पती यांच्या संयुक्त नावावर असलेल्या व उक्त नियमान्वये अभिहस्तांकित केलेल्या विमापत्राची रक्कम वर्गणीदाराची पत्नी किंवा पती मृत झाल्याकारणाने देय होत असेल तर, लेखा अधिकाऱ्याने, नियम २४ मध्ये उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त पुढीलप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे :—

(एक) कोणत्याही उपार्जित अधिलाभांशाची रक्कम धरून विमा उतरविलेली रक्कम ही [1][* * * *] विमापत्राच्या संबंधात रोखून ठेवलेल्या किंवा निधीतून काढून घेतलेल्या संपूर्ण रकमेपेक्षा मोठी असेल तर लेखा अधिकाऱ्याने, वर्गणीदाराकडे किंवा यथास्थिती वर्गणीदाराकडे आणि त्याच्या संयुक्त विमेदाराकडे चौथ्या अनुसूचीमध्ये घालून दिलेल्या नमुन्यात विमापत्र पुन्हा अभिहस्तांकित केले पाहिजे, आणि वर्गणीदारास दिले पाहिजे, आणि वर्गणीदाराने महामंडळाकडून विमापत्राचे पैसे मिळाल्यानंतर तावडतोब [2][* * * *] रोखून ठेवलेली किंवा काढलेली कोणतीही संपूर्ण रक्कम निधीमध्ये भरली पाहिजे किंवा परत केली पाहिजे आणि रक्कम देण्यात कसूर झाल्यास नियम २५ चे उपबंध हे, ज्या बाबींमध्ये नियम १४ च्या खंड (अ) किंवा (ब) अन्वये रोखून ठेवलेले किंवा निधीतून काढून घेतलेले पैसे, ते ज्या प्रयोजनार्थ रोखून ठेवण्यास किंवा काढून घेण्यास मंजुरी देण्यात आली असेल त्याशिवाय इतर प्रयोजनाकरिता वापरण्यात आले असतील अशा बाबींच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते लागू होतील.

(दोन) कोणत्याही उपार्जित अधिलाभांशासह विमा उतरविलेली रक्कम ही, [3][* * *] रोखून ठेवलेल्या किंवा काढून घेतलेल्या संपूर्ण रकमेपेक्षा कमी असेल तर, लेखा अधिकाऱ्याने, कोणत्याही उपार्जित अधिलाभांशासह विमा उतरविलेली रक्कम वसूल केली पाहिजे आणि अशा रीतीने वसूल केलेली रक्कम निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा केली पाहिजे.

(२) नियम २४ मध्ये उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, नियम १९, पोटनियम (१), खंड (ब) अन्वये लेखा अधिकाऱ्यास दिलेल्या विमापत्राची मुदत वर्गणीदाराने सेवा सोडण्यापूर्वी संपत असेल तर, लेखा अधिकाऱ्याने वर्गणीदारास विमापत्र दिले पाहिजे :

परंतु, विमापत्रावरून स्पष्ट होणारा, वर्गणीदाराच्या पत्नीचा, किंवा त्याच्या पत्नीचा व मुलांचा किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकाचा विमापत्रातील हितसंबंध, विमापत्राची मुदत संपल्याबरोबर संपत असेल तर, वर्गणीदाराने महामंडळाने त्यास विमापत्राचे पैसे दिले असतील तर, असे पैसे मिळाल्यानंतर लगेच, निधीमध्ये—

(एक) [1][* * *] विमापत्राच्या संबंधात रोखून ठेवलेली किंवा निधीतून काढलेली कोणतीही संपूर्ण रक्कम, किंवा

---

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

२. किता.

३. किता.

(दोन) कोणत्याही उपार्जित अधिलाभांशासह विमा उतरविलेल्या रकमेइतकी रक्कम, यांपैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम, निधीमध्ये भरली पाहिजे किंवा परत केली पाहिजे, आणि रक्कम देण्यात कसूर झाल्यास, नियम २५ चे उपबंध हे, ज्या बाबींमध्ये नियम १४ च्या खंड (अ) किंवा (ब) अन्वये रोखून ठेवलेले किंवा निधीतून काढून घेतलेले पैसे, ते ज्या प्रयोजनार्थ रोखून ठेवण्यास किंवा काढून घेण्यास मंजुरी देण्यात आली असेल त्याशिवाय, इतर प्रयोजनार्थाकरिता वापरण्यात आले असतील अशा बाबींच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते लागू होतील.

२३. विमापत्र व्यपगत झाल्यास, किंवा नियम १९ अन्वये ते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अभिहस्तांकित करण्यात येईल त्या व्यतिरिक्त, अभिहस्तांकित करण्यात आले असेल, त्यावर आकारणी करण्यात आली असेल किंवा ते भारग्रस्त असेल तर, अभिहस्तांकन करण्यात आणि ते स्वाधीन करण्यात कसूर केल्याच्या बाबतीत लागू असणारे नियम १९ च्या पोटनियम (४) चे उपबंध लागू होतील.

२४. लेखा अधिकाऱ्यास—

(अ) अभिहस्तांकनाची (नियम १९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यापुढे केलेल्या अभिहस्तांकनाव्यतिरिक्त इतर अभिहस्तांकन) किंवा

(ब) विमापत्रावरील किंवा त्यापासून प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेवरील आकारणीसंबंधीची किंवा भारासंबंधीची, किंवा

(क) विमापत्राच्या किंवा त्यापासून प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेच्या व्यवहारांना निरोध करण्यासंबंधातील न्यायालयाच्या आदेशाची नोटीस मिळाल्यास लेखा अधिकाऱ्याने —

(एक) नियम २१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, विमापत्र पुन्हा अभिहस्तांकित करता कामा नये किंवा ते देता कामा नये; किंवा

(दोन) नियम २२ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने विमापत्राद्वारे विमा उतरविलेली रक्कम वसूल करता कामा नये किंवा विमापत्र पुन्हा अभिहस्तांकित करता कामा नये किंवा ते देता कामा नये; मात्र, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे ताबडतोब ही बाब निर्णयार्थ पाठविली पाहिजे.

२५. या नियमांमध्ये काहीही असले तरी, नियम १२ च्या खंड (१) अन्वये निधीतून आगाऊ म्हणून काढलेली किंवा नियम १४ च्या खंड (अ) किंवा (ब) अन्वये रोखून ठेवलेली किंवा निधीतून काढलेले पैसे हे, ते ज्या प्रयोजनार्थ रोखून ठेवण्यास किंवा काढून घेण्यास मंजुरी देण्यात आली होती त्या व्यतिरिक्त प्रयोजनासाठी वापरण्यात आले आहेत अशी, रकमा मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याची खात्री होईल तर, [1][***] प्रस्तुत रक्कम, वर्गणीदाराकडून ताबडतोब यथास्थिती निधीमध्ये परत देण्यात येईल किंवा भरण्यात येईल किंवा रक्कम देण्यात कसूर झाल्यास, वर्गणीदार रजेवर असला तरीही, त्याच्या वित्तलब्धीतून एकरकमेने ती वजा करून वसूल करण्याचा आदेश देण्यात येईल. परत करावयाची किंवा यथास्थिती द्यावयाची रक्कम ही, वर्गणीदाराच्या वित्तलब्धीच्या रकमेच्या निम्म्याहून अधिक असेल तर, त्याचेकडून वसुलीयोग्य सर्व रक्कम यथास्थिती परत करण्यात येईतोपर्यंत किंवा भरण्यात येईतोपर्यंत, त्याच्या वित्तलब्धीच्या निम्म्या भागाच्या मासिक हप्त्याने वसुली करण्यात येईल.

**स्पष्टीकरण:**—या नियमात वापरण्यात आलेल्या "वित्तलब्धी" या शब्दप्रयोगात निर्वाह अनुदानाचा समावेश होत नाही.

---

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.



### निधीतून पैसा काढणे

२६. (१) या नियमाच्या उपबंधांस अधीन राहून, नियम १२, पोटनियम (१), खंड (क) अन्वये ज्या आगाऊ रकमेस मंजुरी देण्यासाठी विशेष कारणाची आवश्यकता असते अशी आगाऊ रक्कम, मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून वर्गणीदाराची वीस वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर (सेवेचा कोणताही खंडित काल असल्यास, तो धरून) किंवा नियत सेवावधी संपल्यानंतरच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी दहा वर्षांच्या आत, यापैकी जी अगोदरची मुदत असेल त्यापैकी कोणत्याही वेळी, निधीत त्याच्या खाती जमा असेल इतक्या रकमेतून पुढील कोणत्याही एका किंवा अधिक कारणासाठी, काढण्यास मंजुरी देण्यात येईल:—

(अ) वर्गणीदाराच्या कोणत्याही मुलाच्या आवश्यक असेल तेथे प्रवास खर्चासह म्हणजे [1][***] उच्च शिक्षणाचा खर्च भागविणेसाठी पुढील बाबी म्हणजे—

[2][(एक) माध्यमिक शिक्षणानंतरच्या कोणत्याही शैक्षणिक, तांत्रिक, व्यावसायिक किंवा धंदेविषयक पाठ्यक्रमाचे भारताबाहेर शिक्षण घेण्याकरिता आणि],

(दोन) माध्यमिक शिक्षणानंतरचा वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा इतर तांत्रिक किंवा विशेषीकृत पाठ्यक्रम भारतात पूर्ण करण्याकरिता—(परंतु असा पाठ्यक्रम तीन वर्षांहून कमी कालावधीचा असता कामा नये),

(ब) वर्गणीदाराच्या मुलाच्या, मुलीच्या किंवा [3][त्याच्यावर अवलंबून असलेल्या इतर कोणत्याही स्त्री नातलगाच्या] आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती विवाहासंबंधातील खर्च भागविणे;

(क) वर्गणीदार [4][आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती] किंवा त्याच्यावर प्रत्यक्षपणे, अवलंबून असलेला इतर कोणताही इसम यांचा, आवश्यक असेल तेथे प्रवासखर्च धरून आजारपणासंबंधातील खर्च भागविणे;

(ड) जागेच्या किंमतीसह, त्याच्या निवासासाठी योग्य असे घर बांधणे किंवा खरेदी करणे किंवा [5][***] ह्या प्रयोजनार्थ स्पष्टपणे घेतलेल्या कर्जादाखल येणे असलेली कोणतीही रक्कम परत करणे किंवा वर्गणीदाराची अगोदरच मालकी असेल किंवा त्याने संपादन केले असेल, अशा घराची पुनर्बांधणी किंवा त्यात सुधारणा व फेरबदल करणे;

(इ) घराची जागा खरेदी करणे किंवा [6][***] निःसंदिग्धपणे ह्या प्रयोजनार्थ घेतलेल्या कर्जादाखल येणे असलेली कोणतीही रक्कम परत करणे;

(फ) वरील खंड (इ) अन्वये काढलेली रक्कम वापरून खरेदी केलेल्या जागेवर घर बांधणे;

(ग) सहकारी संस्था किंवा गृहनिर्माण मंडळ यांच्या मालकीच्या इमारतीत मालकी हक्काच्या तत्त्वावर फ्लॅट बांधणे किंवा खरेदी करणे;

(ह) [7][सहकारी संस्था किंवा गृहनिर्माण मंडळ किंवा शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित] यांनी बांधलेल्या इमारतीत भाडेखरेदी तत्त्वावर फ्लॅट खरेदी करणे;

(आय) भारत सरकारने पुरस्कृत केलेल्या "कमी उत्पन्न गट गृहनिर्माण योजने" अन्वये घेतलेले कर्ज परत करणे;

टीप.—"कमी उत्पन्न गट गृहनिर्माण योजने" खालील आगाऊ रकमेचा किंवा घर बांधण्यासाठी जिल्हा परिषदेने मंजूर केलेल्या आगाऊ रकमेचा ज्या वर्गणीदाराने फायदा घेतला आहे असा एखादा

---

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेनुसार हा मजकूर काढणेत आला.
२. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेनुसार हा नवीन मजकूर दाखल करण्यात आला.
३. कित्ता.
४. कित्ता.
५. वरील अधिसूचनेनुसार हा मजकूर वगळण्यात आला.
६. कित्ता.
७. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेनुसार मूळ मजकुराऐवजी नवीन मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावाने केलेले कोणतेही नामनिर्देशन अस्तित्वात नसेल, किंवा असे नामनिर्देशन हे, निधीत त्याच्या खाती शिल्लक असलेल्या रकमेच्या भागाशीच केवळ संबंधितच असेल तर, नामनिर्देशन ज्या रकमेसंबंधी नसेल अशी यथास्थिती संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग हा नामनिर्देशन करून त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा व्यक्तीशिवाय, कोणत्याही इसमाच्या नावाने केल्याचे अभिप्रेत असेल तरीदेखील समान प्रमाणात देय होईल :

परंतु, खंड (१), (२), (३) आणि (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीशिवाय कुटुंबात खालीलपैकी कोणतीही व्यक्ती असेल तर त्यांना कोणताही भाग देय होणार नाही,—

(१) विधीग्राह्य वयस्कता प्राप्त झालेली मुले;

(२) मृत मुलांची विधीग्राह्य वयस्कता प्राप्त झालेली मुले;

(३) ज्यांचे पती जिवंत असतील अशा विवाहित मुली;

(४) मृत मुलाच्या पती हयात असलेल्या विवाहित मुली :

तसेच, मृत मुलाची विधवा किंवा त्याच्या विधवा आणि त्याचे मूल किंवा मुले यांना, वर्गणीदाराच्या मागे तो हयात असता तर आणि पहिल्या परंतुकाच्या खंड (१) च्या तरतुदींमधून त्यास वगळण्यात आले तर त्यास जो भाग मिळाला असता केवळ तोच भाग समप्रमाणात मिळेल;

(दोन) वर्गणीदाराच्या मागे कुटुंब नसेल तेव्हा, वर्गणीदाराने नियम ५ च्या प्रबंधास अनुसरून कोणत्याही इसमाच्या किंवा इसमांच्या नावाने केलेले नामनिर्देशन अस्तित्वात असेल तर, ज्या रकमेसंबंधात नामनिर्देशन केले असेल अशी निधीमध्ये त्याच्या खाती शिल्लक असेल इतकी रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, त्याच्या नामनिर्दिष्ट इसमास किंवा इसमांस नामनिर्देशन-पत्रात निर्दिष्ट केलेल्या प्रमाणात, देय होईल.

[1][ ३१-अ. (१) निधीतील रक्कम नामनिर्दिष्ट व्यक्तीस,—

(अ) जे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे माहीत असेल अशा प्रकरणाच्या बाबतीत देण्यात येणार नाही, व

(ब) ज्यामध्ये दावा दाखल करण्यात येण्याची शक्यता असेल त्या बाबतीत, लेखा अधिकारी, जिल्हा परिषद विशिष्ट तारखेनंतर, नामनिर्दिष्ट व्यक्तीस ती रक्कम प्रदान करील असे, दावा दाखल करण्याचा इरादा असणाऱ्या पक्षकारास लेखी कळवील;

(२) सुरुवातीच्या न्यायालयाने आदेश दिल्यानंतर एखाद्या पक्षकाराचा अशा न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील करण्याचा इरादा असेल तर, लेखा अधिकारी, दाव्यात हरणाऱ्या पक्षकारास, नामनिर्दिष्ट व्यक्तीस निधीतून ती रक्कम देण्यात येईल असे लेखी कळवील.]

३२. (१) निधीतील वर्गणीदाराच्या खाती शिल्लक असलेली रक्कम देय होईल त्या बाबतीत, लेखा अधिकाऱ्याने भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९२५ याच्या कलम ४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने रक्कम देणे हे त्याचे कर्तव्य असेल.

(२) ह्या नियमांन्वये ज्यास कोणतीही रक्कम किंवा विमापत्र द्यावयाचे आहे किंवा अभिहस्तांकित किंवा पुन्हा अभिहस्तांकित करावयाचे आहे किंवा स्वाधीन करावयाचे आहे असा इसम वेडा असेल आणि ज्याच्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्यासाठी भारतीय उन्माद अधिनियम, १९१२ अन्वये व्यवस्थापक नेमण्यात आला असेल तर, ती रक्कम किंवा ते विमापत्र अशा व्यवस्थापकास देण्यात येईल किंवा पुन्हा अभिहस्तांकित किंवा स्वाधीन करण्यात येईल, आणि अशा वेडयास देण्यात येणार नाही किंवा पुन्हा अभिहस्तांकित किंवा स्वाधीन करण्यात येणार नाही.

---

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेनुसार नवीन मजकूर समाविष्ट करण्यात आला.



[1][ (३) काढण्यात आलेली रक्कम केवळ भारतातच देण्यात येईल, ज्यांना रकमा देय असतील अशा व्यक्ती भारतात रकमा मिळण्यासाठी स्वतः होऊन व्यवस्था करतील, वर्गणीदाराने मागणी केलेल्या रकमेसाठी पुढील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येईल :—

(एक) वर्गणीदारांस, निधीतील रक्कम मिळण्यासाठी, नियत सेवावधीच्या तारखेच्या किमान एक वर्ष आधी कार्यालय किंवा विभाग प्रमुखामार्फत लेखा अधिकाऱ्यास अर्ज सादर करता येईल. असा अर्ज, त्याच्या नियत सेवावधीपूर्वीच्या एक वर्ष अखेरच्या वर्षासाठी लेखाविषयक विवरणपत्रात दर्शवण्यात आल्याप्रमाणे निधीत त्याच्या खाती जमा असलेल्या रकमेसाठी किंवा असे लेखाविषयक विवरणपत्र मिळालेले नसेल त्या बाबतीत त्याच्या खातेवही लेख्यात दर्शविण्यात आलेल्या रकमेसाठी करता येईल ;

(दोन) कार्यालय प्रमुख किंवा यथास्थिती जिल्हा परिषद, घेण्यात आलेली अग्रिमे व अशा अद्यापपर्यंत चालू असलेल्या अग्रिमांच्या बाबतीत करण्यात आलेली वसुली व अशा प्रत्येक अग्रिमाच्या बाबतीत अद्याप वसूल करण्यात यावयाच्या हप्त्यांची संख्या दर्शवून असा अर्ज अग्रेषित करील; त्याचप्रमाणे वर्गणीदाराने काढलेल्या रकमासुद्धा कोणत्याही असल्यास, त्या दर्शवील ;

(तीन) लेखा अधिकारी, खातेवही लेख्याशी पडताळणी करण्यात आल्यानंतर, अर्जात दर्शवण्यात आलेली रक्कम नियत सेवावधीच्या तारखेस देय असेल असे दर्शवणारे प्राधिकारपत्र नियत सेवावधीच्या तारखेपूर्वी किमान एक महिना पाठवील ;

(चार) खंड (तीन) मध्ये उल्लेखिलेल्या प्राधिकारपत्रान्वये रकमेचा पहिला हप्ता देण्यात येईल. रक्कम देण्यासंबंधातील दुसरे प्राधिकारपत्र नियत सेवावधीनंतर शक्य तितक्या लवकर देण्यात येईल. अशा प्राधिकारपत्रामध्ये खंड (एक) अन्वये सादर करण्यात आलेल्या अर्जात नमूद केलेल्या रकमेनंतर वर्गणीदाराने केलेले अंशदान अधिक दिल्या अर्जाच्या वेळी अग्रिम म्हणून ज्या रकमांचे हप्ते परत करण्यात येत होते अशा हप्त्यासंबंधात परत केलेल्या रकमा दर्शवण्यात येतील.

(पाच) लेखा अधिकाऱ्याकडे अंतिम प्रदानासाठी अर्ज अग्रेषित करण्यात आल्यानंतर मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिमाबाबत व काढण्यात यावयाच्या रकमाबाबत लेखा अधिकाऱ्यास तातडीने कळवण्यात येईल व मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्यास तत्संबंधात पोच घ्यावी लागेल.

टीप.—वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम नियम २९, ३० किंवा ३१ अन्वये देय होईल तेव्हा, लेखा अधिकारी पोटनियम (३) मध्ये दर्शविण्यात आलेल्या रीतीने रक्कम तातडीने देण्याबाबत प्राधिकार देईल.]

[2][ ३३. (१) भारतातील कोणत्याही शासनाने किंवा मंडळाने किंवा दुसऱ्या जिल्हा परिषदेने किंवा इतर कोणत्याही संस्थेने प्रस्थापित केलेल्या इतर कोणत्याही भविष्यनिर्वाह निधीची (अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नसेल अशा) वर्गणीदार असेल अशा व्यक्तीची जिल्हा परिषदेखालील निवृत्तिवेतनी सेवेमध्ये कायम बदली करण्यात आली असेल तर, बदलीच्या तारखेस अशा निधीमध्ये त्याच्या लेख्यामध्ये जमा असलेली त्याच्या वर्गणीची रक्कम तिच्यावरील व्याजासह अशा शासनाच्या, जिल्हा परिषदेच्या किंवा संस्थेच्या संमतीने निधीमध्ये त्याच्या लेख्यामध्ये जमा करण्यात येईल.

(२) भारतातील कोणत्याही शासनाने किंवा मंडळाने किंवा दुसऱ्या जिल्हा परिषदेने किंवा कोणत्याही इतर संस्थेने प्रस्थापित केलेल्या अंशदायी भविष्यनिर्वाह निधीची वर्गणीदार असलेल्या व्यक्तीची जिल्हा परिषदेखालील निवृत्तिवेतनी सेवेत कायम बदली करण्यात आली असेल आणि

---

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे नवीन मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. दिनांक ६ मार्च १९७० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अशा निवृत्तिवेतनी सेवेच्या बाबतीत ज्याने निवृत्तिवेतनाची निवड केली असेल किंवा तशी निवड करण्यास त्यास भाग पडले असेल तर—

(एक) बदली केल्याच्या तारखेस अशा अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याच्या लेख्यामध्ये असलेली त्याच्या वर्गणीची रक्कम तिच्यावरील व्याजासह अशा शासनाच्या, जिल्हा परिषदेच्या किंवा संस्थेच्या संमतीने निधीमध्ये त्याच्या लेख्यामध्ये जमा करण्यात येईल;

(दोन) अशा अंशदायी भविष्यनिर्वाह निधीत शासनाच्या, मंडळाच्या इतर जिल्हा परिषदेच्या किंवा कोणत्याही इतर संस्थेच्या अंशदानाची, त्याच्या लेख्यामध्ये जमा असलेली रक्कम तिच्यावरील व्याजासह, अशा शासनाच्या जिल्हा परिषदेच्या किंवा अशा संस्थेच्या संमतीने जिल्हा परिषदेस देण्यात येईल आणि जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधीत जमा करण्यात येईल;

(तीन) वर्गणीदारास त्याऐवजी, त्याने अशा अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमध्ये ज्या कालावधीत वर्गणी दिली असेल अशा कालावधीचा जिल्हा परिषद ठरवील तेवढा भाग निवृत्तिवेतनासाठी मोजण्याचा हक्क मिळेल.

(३) जो सेवेतून निवृत्त झालेला आहे आणि सेवेत खंड पाडून किंवा खंड न पाडता ज्याचे पुन्हा सेवायोजन झाले आहे अशा वर्गणीदारास किंवा करारावर ज्याची पूर्वी नेमणूक झाली आहे अशा वर्गणीदारास या नियमातील कोणताही मजकूर लागू होणार नाही. ]

३४. (१) वर्गणीदारास त्यानंतर जिल्हा परिषदेच्या अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचा फायदा देण्यात आला असेल तर, त्याच्या वर्गणीची रक्कम तिच्या व्याजासह, जिल्हा परिषदेच्या अंशदायी भविष्यनिर्वाह निधीतील त्याच्या जमा खाती बदली करण्यात येईल.

(२) ज्याची करारावर नेमणूक झाली आहे किंवा ज्यास सेवामुक्त करण्यात आले आहे आणि सेवेत खंड पडून किंवा खंड न पडता अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचा लाभ मिळणाऱ्या दुसऱ्या पदावर ज्यास नंतर पुन्हा कामावर लावण्यात आले असेल अशा वर्गणीदारास या नियमांतील कोणताही मजकूर लागू होणार नाही.

३५. या नियमातील कोणताही नियम अमलात आल्यामुळे एखाद्या वर्गणीदारास अकारण अडचण सोसावी लागत आहे किंवा सोसावी लागण्याचा संभव आहे अशी शासनाची खात्री होईल अशा बाबतीत, शासनास, या नियमात काहीही असले तरी, अशा वर्गणीदाराच्या बाबतीत, त्यास न्याय्य व समतोल वाटेल अशा रीतीने त्यावर कार्यवाही करता येईल.

## कार्यपद्धतीचे नियम

३६. या नियमान्वये निधीला दिलेल्या सर्व रकमा जिल्हा परिषदेच्या पुस्तकांमध्ये "..... (जिल्ह्याचे नाव) जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी" या नावाच्या खात्यावर जमा करण्यात येतील. या नियमान्वये रकमा देय झाल्यानंतर सहा महिन्यांत त्या काढून घेतल्या नाहीत तर वर्षाच्या अखेरीस त्या रकमांचा "ठेवी" या खात्याकडे खातेबदल करण्यात येईल आणि ठेवींच्या संबंधातील साधारण नियम त्यास लागू होतील.

३७. वित्तलब्धीतून वजावट करून किंवा रोख रकमेत वर्गणी भरताना वर्गणीदाराने त्यास लेखा अधिकाऱ्याकडून कळविण्यात आलेला, निधीतील त्याचा खातेक्रमांक उद्धृत केला पाहिजे. त्याचप्रमाणे क्रमांकातील कोणताही बदल लेखा अधिकाऱ्याने वर्गणीदारास कळविला पाहिजे.

३८. (१) लेखा अधिकाऱ्याने, प्रत्येक वर्ष संपल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, प्रत्येक वर्गणीदारास निधीतील त्याच्या हिशोबासंबंधीचे विवरणपत्र पाठविले पाहिजे आणि अशा विवरणपत्रात १ एप्रिल रोजी असलेली प्रारंभिक शिल्लक, वर्षात जमा किंवा खर्च झालेली एकूण रक्कम,



वर्षाच्या ३१ मार्च रोजी जमा झालेल्या व्याजाची रक्कम आणि त्या तारखेस असलेली अखेरची शिल्लक दर्शविली पाहिजे. लेखा अधिकाऱ्याने—

(अ) नियम ५ अन्वये केलेल्या कोणत्याही नामनिर्देशनात कोणताही फेरबदल करण्याची वर्गणीदाराची इच्छा आहे किंवा काय;

(ब) ज्या बाबतीत वर्गणीदाराने नियम ५, पोटनियम (१) च्या परंतुकान्वये त्याच्या कुटुंबातील व्यक्तीच्या नावाने नामनिर्देशन केले नसेल अशा प्रकरणांमध्ये वर्गणीदाराने कुटुंब केले आहे किंवा काय; यासंबंधीच्या चौकशीचे पत्रक विवरणपत्रास जोडले पाहिजे.

(२) वर्गणीदारांनी वार्षिक विवरणपत्राच्या बिनचूकपणाबद्दल स्वतःची खात्री करून घेतली पाहिजे आणि त्यातील चुका ह्या, विवरणपत्र मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत लेखा अधिकाऱ्याच्या नजरेस आणून दिल्या पाहिजेत.

(३) लेखा अधिकाऱ्याने, वर्गणीदारास हवे असेल तर, वर्षातून फक्त एकदाच, ज्या शेवटच्या महिन्याच्या अखेरीस त्याचा हिशोब लिहून काढला असेल त्या महिन्यात निधीत त्याच्या खाती जमा असलेली एकूण रक्कम त्यास कळविली पाहिजे.

## विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यांच्या विमापत्रांचे पुनर्अभिहस्तांकन

३९. बदलीच्या तारखेच्या लगतपूर्वी विभागणीप्राप्त कर्मचारी ज्या भविष्यनिर्वाह निधीत वर्गणी भरत असतील अशा भविष्यनिर्वाह निधीतून भरणा होत असलेली आणि त्या भविष्यनिर्वाह निधीच्या नियमान्वये विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अभिहस्तांकित केलेली, त्यांची विमापत्रे ही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पुनर्अभिहस्तांकित करण्यात येतील.

## पूर्वीच्या नियमांचा अंमल बंद होणे

४०. विभागणीप्राप्त कर्मचाऱ्यांना हे नियम ज्या तारखेस व ज्या तारखेपासून लागू होतात त्या तारखेस व त्या तारखेपासून, ह्या कर्मचाऱ्यांना त्या तारखेच्या लगतपूर्वी लागू असलेले, अंशदायी नसलेल्या भविष्यनिर्वाह निधीचे नियम लागू होण्याचे बंद होईल; मात्र केलेल्या किंवा करावयाचे राहून गेलेल्या गोष्टींच्या बाबतीत त्यांचा अंमल चालू राहील.

# पहिली अनुसूची

[नियम ५(५) पहा]

## नामनिर्देशनाचे नमुने

**(एक) वर्गणीदारास कुटुंब असेल आणि त्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीस नामनिर्देशित करण्याची त्याची इच्छा असेल तेव्हा (भरावयाचे नामनिर्देशनपत्र).**

मी याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६ याच्या नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे माझ्या कुटुंबातील एक घटक असलेल्या खाली निर्दिष्ट केलेल्या इसमास, निधीमध्यें माझ्या खाती जमा असलेली रक्कम, ती रक्कम देय होण्यापूर्वी, मी मरण पावल्यास किंवा देय होऊनही देण्यात आली नसेल तर, मिळण्यासाठी नामनिर्दिष्ट करीत आहे :—

| नामनिर्देशित व्यक्तीचे नाव व पत्ता | वर्गणी-दाराशी नाते | वय | नामनिर्देशन अवैध होईल अशा आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती वर्गणी-दाराच्या अगोदर मरण पावल्यास किंवा स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट केलेली किंवा केलेल्या आकस्मिक घटना घडून आल्यास, नामनिर्देशित व्यक्तीचा अधिकार ज्यास देण्यात येईल असा कोणताही इसम किंवा असे कोणतेही इसम असल्यास, त्याचे नाव किंवा नावे, पत्ता व नाते. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

दिनांक :

ठिकाण :

सहीचे दोन साक्षीदार : वर्गणीदाराची सही.

१.

२.



(दोन) वर्गणीदारास कुटुंब असेल आणि त्या कुटुंबातील एकाहून अधिक व्यक्तींना नामनिर्देशित करण्याची त्याची इच्छा असेल तेव्हा (भरावयाचे नामनिर्देशनपत्र).

मी, याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६ याच्या नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे माझ्या कुटुंबातील घटक असलेल्या खाली निर्दिष्ट केलेल्या इसमांस, निधीमध्ये माझ्या खाती जमा असलेली रक्कम, ती रक्कम देय होण्यापूर्वी, मी मरण पावल्यास किंवा देय होऊनही देण्यात आली नसेल तर, ती मिळण्यासाठी नामनिर्देशित करीत आहे आणि उक्त रक्कम ही, उक्त इसमांना त्यांच्या नावांपुढे दर्शविल्याप्रमाणे वाटून देण्यात यावी, असा निदेश देत आहे :—

| नामनिर्देशित व्यक्तींची नावे व पत्ता | वर्गणी-दाराशी नाते | वय | *प्रत्येकास संचित रकमेमधून द्यावयाची रक्कम किंवा भाग | नामनिर्देशन अवैध होईल अशा आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती वर्गणीदाराच्या अगोदर मरण पावल्यास, किंवा स्तंभ (५) मध्ये निर्दिष्ट केलेली किंवा केलेल्या आकस्मिक घटना घडून आल्यास, नामनिर्देशित व्यक्तींचा अधिकार ज्यास देण्यात येईल असा कोणताही इसम किंवा असे कोणतेही इसम असल्यास त्यांची नावे, पत्ता व नाते |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

*टीप.—वर्गणीदाराच्या खात्यात कोणत्याही वेळी, जमा असलेल्या निधीतील सर्व रकमेचा समावेश होईल अशा रीतीने हा स्तंभ भरण्यात यावा.

दिनांक :

ठिकाण :

वर्गणीदाराची सही.

सहीचे दोन साक्षीदार :

१.

२.

(तीन) वर्गणीदारास कुटुंब नसेल आणि एकाच इसमास नामनिर्देशित करण्याची त्याची इच्छा नसेल तेव्हा (भरावयाचे नामनिर्देशनपत्र).

महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी, नियम, १९६६ याच्या नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मला कोणतेही कुटुंब नसल्यामुळे मी, याद्वारे, खाली निर्दिष्ट केलेल्या इसमास निधीमध्ये माझ्या खाती जमा असलेली रक्कम, ती देय होण्यापूर्वी, मी मरण पावल्यास किंवा देय होऊनही देण्यात आली नसेल तर, ती मिळण्यासाठी नामनिर्देशित करीत आहे :—

| नामनिर्देशित इसमाचे नाव व पत्ता | वर्गणी-दाराशी नाते | वय | *नामनिर्देशन अवैध होईल अशा आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती वर्गणी-दाराच्या अगोदर मरण पावल्यास किंवा स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट केलेली किंवा केलेल्या आकस्मिक घटना घडून आल्यास, नामनिर्देशित व्यक्तीचा अधिकार ज्यास देण्यात येईल असा कोणताही किंवा असे कोणतेही इसम असल्यास, त्याचे नाव किंवा नावे, पत्ता व नाते. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

*टीप.—ज्यास कुटुंब नाही अशा एखाद्या वर्गणीदाराने एखादा इसम नामनिर्देशित केला असेल तेव्हा, त्याने नंतर कुटुंब संपादन केल्यास त्या इसमाचे नामनिर्देशन अवध होईल असे ह्या स्तंभात निर्दिष्ट केले पाहिजे.

दिनांक :

ठिकाण :

वर्गणीदाराची सही.

सहीचे दोन साक्षीदार :

१.

२.

(चार) वर्गणीदारास कुटुंब नसेल आणि एकाहून अधिक इसमांस नामनिर्देशित करण्याची त्याची इच्छा असेल तेव्हा (भरावयाचे नामनिर्देशनपत्र).

महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६ याच्या नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मला कुटुंब नसल्यामुळे, मी याद्वारे, खाली निर्दिष्ट केलेल्या इसमांस, निधीमध्ये माझ्या खाती जमा असलेली रक्कम, ती देय होण्यापूर्वी, मी मरण पावल्यास किंवा देय



होऊनही देण्यात आली नसेल तर, ती मिळण्यासाठी नामनिर्देशित करीत आहे आणि उक्त रक्कम ही, उक्त इसमांना त्यांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे वाटून देण्यात यावी, असा निदेश देत आहे:—

| नामनिर्देशित इसमाचे नाव व पत्ता | वर्गणी-दाराशी नाते | वय | *प्रत्येकास संचित निधीमधून द्यावयाची रक्कम किंवा भाग | †नामनिर्देशन अवैध होईल अशा आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती वर्गणीदाराच्या अगोदर मरण पावल्यास, किंवा स्तंभ (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या किंवा केलेली आकस्मिक घटना घडून आल्यास, नामनिर्देशित व्यक्तींचा अधिकार ज्यास देण्यात येईल असा कोणताही इसम किंवा असे कोणतेही इसम असल्यास त्यांची नावे, पत्ता व नाते. |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

*वर्गणीदाराच्या खात्यात कोणत्याही वेळी जमा असलेल्या, निधीतील सर्व रकमेचा समावेश होईल अशा रीतीने हा स्तंभ भरण्यात यावा.

†ज्यास कुटुंब नाही असा वर्गणीदार जेव्हा नामनिर्देशन करील, तेव्हा त्याने, नंतर कुटुंब संपादन केल्याच्या प्रसंगी नामनिर्देशन अवैध होईल असे या स्तंभात निर्दिष्ट केले पाहिजे.

दिनांक :

ठिकाण :

वर्गणीदाराची सही.

सहीचे दोन साक्षीदार

१.

२.

## दुसरी अनुसूची

[नियम १९ (१) (अ) पहा]

अभिहस्तांकनाचे नमुने

(एक)

मी, अ ब राहणार ·············· याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्य-निर्वाह निधी नियम, १९६६ यातील नियम २३ अन्वये मला यापुढे त्या निधीस द्याव्या लागतील अशा सर्व रकमा देण्यासाठी तारणपत्र म्हणून विम्याचे निर्दिष्ट विमापत्र, *········· जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अभिहस्तांकित करीत आहे.

निर्दिष्ट विमापत्र यापूर्वी अभिहस्तांकित केलेले नाही असे मी याद्वारे प्रमाणित करतो.

दिनांक माहे ·············१९ .

सहीचा एक साक्षीदार.

वर्गणीदाराची सही

ठिकाण :

(दोन)

आम्ही, अ ब राहणार ·········· आणि क ड संयुक्त विमेदार, राहणार ··········· जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीस माझ्याकडून म्हणजे उक्त अ ब कडून देय असलेल्या वर्गणी ऐवजी निर्दिष्ट विमापत्रासाठी रकमा देण्याच्या (किंवा यथास्थिती, निर्दिष्ट विमापत्राचा हप्ता देण्यासाठी म्हणून *·········· जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत उक्त अ ब च्या खाती जमा असलेल्या रकमेतून रुपये ······ इतकी रक्कम काढण्यास मान्यता देण्याचा) आमच्या विनंतीस *·········· जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कबूल झाले आहेत म्हणून, याद्वारे, संयुक्तपणे व पृथकपणे महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६ यातील नियम २३ अन्वये उक्त अ ब ला यापुढे त्या निधीस जमा द्याव्या लागतील अशा सर्व रकमा देण्यासाठी तारणपत्र म्हणून निर्दिष्ट विमापत्र ············ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अभिहस्तांकित करीत आहोत.

निर्दिष्ट विमापत्र यापूर्वी अभिहस्तांकित केलेले नाही असे आम्ही याद्वारे प्रमाणित करतो.

दिनांक माहे ·········१९ .

वर्गणीदाराची आणि संयुक्त विमेदाराची सही.

सहीचा एक साक्षीदार.

ठिकाण :

*येथे जिल्ह्याचे नाव लिहावे.



(तीन)

मी, अ ब ची पत्नी आणि निर्दिष्ट विमापत्राची अभिहस्तांकिती क ड, विमेदार अ ब, यांच्या विनंतीवरून* ···· जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीस अ ब यांचेकडून देय असलेल्या वर्गणीऐवजी निर्दिष्ट विमापत्रासंबंधीच्या रकमा देण्यास मान्यता देण्याचे ज्यांनी कबूल केले आहे असा,* ·········· जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अ ब यांना विमापत्र अभिहस्तांकित करता यावे म्हणून, अ ब यांच्या वतीने विमापत्रातील माझा हितसंबंध सोडून देण्यास कबूल असल्यामुळे, अ ब यांच्या विनंतीवरून व त्यांनी निदेश दिल्यावरून, मी आणि उक्त अ ब याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६ यातील नियम २३ अन्वये उक्त अ ब यांना यापुढे त्या निधीस देता येतील अशा रकमा देण्यासाठी, निर्दिष्ट विमापत्र* ······· जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अभिहस्तांकित करीत आहोत आणि कायम करीत आहोत.

निर्दिष्ट विमापत्र यापूर्वी अभिहस्तांकित केलेले नाही असे आम्ही याद्वारे प्रमाणित करीत आहोत

दिनांक माहे ········१९ .

अभिहस्तांकिती आणि वर्गणीदार यांची सही.

सहीचा एक साक्षीदार.

ठिकाण :

*येथे जिल्ह्याचे नाव लिहावे.

टीप.—अभिहस्तांकन हे, विमापत्रावरच वर्गणीदाराच्या हस्ताक्षरात लिहिण्यात येईल किंवा टंकलिखित करण्यात येईल किंवा पर्याय म्हणून अभिहस्तांकनाची टंकलिखित किंवा मुद्रित चिठ्ठी ही, विमापत्रावर त्या कारणासाठी ठेवलेल्या कोण्या जागेवर चिकटवण्यात येईल. टंकलिखित किंवा मुद्रित पृष्ठांकनावर योग्य रीत्या सही केलेली असली पाहिजे आणि विमापत्रावर चिकटविलेले असेल तर, चिठ्ठी भागांच्या कोण्या जागांवर अद्याक्षरी करण्यात आली पाहिजे.

---

## तिसरी अनुसूची

(नियम २१ पहा)

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून करण्यात येणाऱ्या पुनर्अभिहस्तांकनाचे नमुने

(एक)

ज्याअर्थी अ ब यांच्याकडून महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६ यातील नियम २३ अन्वये देय झालेल्या सर्व रकमा देण्यात आलेल्या असल्यामुळे आणि [illegible] त्यांच्याकडून अशी कोणतीही रक्कम देण्याबाबतचे सर्व दायित्व संपले असल्यामुळे [illegible] जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याद्वारे निर्दिष्ट विमापत्र, उक्त अ ब/अ ब आणि क ड यांच्याकडे पुन्हा अभिहस्तांकित करीत आहे.

दिनांक माहे ··············१९ .

[illegible] जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी [illegible] यांनी यासाक्षीने य व यांच्या समक्ष लिहिले. } क्ष य (मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची सही)

य व
(एक साक्षीदार, त्याने आपले नाव व पत्ता लिहावा.)

*येथे जिल्ह्याचे नाव नमूद करावे.

(दोन)

उपरोक्त **अ ब** हे ········ १९ या दिवशी मरण पावले असल्यामुळे *········ जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी याद्वारे, निर्दिष्ट विमापत्र **क ड** यांच्याकडे पुन्हा अभिहस्तांकित करीत आहे.

दिनांक माहे ············ १९ .

*············ जिल्हा परिषदेकरिता व तिच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी ···· यानी खालील **य झ** यांच्या समक्ष लिहिले.

**क्ष य**
(मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची सही)

**य**

(एक साक्षीदार, त्याने आपले पदनाम व पत्ता लिहावा.)

विमापत्र मिळण्याचा ज्यास वैध रीत्या हक्क आहे अशा इसमाच्या बाबतीत तपशील लिहावा.

*येथे जिल्ह्याचे नाव लिहावे.

## चौथी अनुसूची

[नियम २२ (१) पहा]

**जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून करण्यात यावयाच्या पुनर्अभिहस्तांकनाचा नमुना**

*······· जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी याद्वारे, निर्दिष्ट विमापत्र उक्त **अ ब** आणि **क** यांच्याकडे पुन्हा अभिहस्तांकित करीत आहे.

दिनांक माहे ············ १९ .

*············ जिल्हा परिषदेकरिता व तिच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी ······ यानी खालील **य झ** यांच्या समक्ष लिहिले.

**य क्ष**
(मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची सही)

**य झ**

(एक साक्षीदार, त्याने आपले पदनाम व पत्ता लिहावा.)

विमापत्र मिळण्याचा ज्यास वैध रीत्या हक्क आहे अशा इसमाच्या बाबतीत तपशील लिहावा.

*येथे जिल्ह्याचे नाव लिहावे.

## पाचवी अनुसूची

[नियम २७ (३) पहा]

**वार्षिक प्रतिज्ञापत्राचा नमुना**

मी, याद्वारे घोषित करतो की, ·············· जमा असलेल्या रकमेतून ·········· आलेले / विकत घेतलेले घर / फ्लॅट हा, १ [१][किंवा खरेदी केलेली घराची जागा ही] मी विक्रीच्या गहाणवटीच्या, देणगीच्या स्वरूपात किंवा अदलाबदल करून किंवा तीन वर्षे किंवा त्याहून अधिक

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



मुदतीसाठी, पट्ट्याने देऊन किंवा अन्यथा हस्तांतरित केलेला नाही आणि त्यासाठी रक्कम मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याची मी पूर्व परवानगी घेतलेली नाही; आणि तसे करण्यास फर्माविण्यात आल्यास, रक्कम मंजूर करणाऱ्या [१][अधिकाऱ्यापुढे घर/फ्लॅट/घराची जागा] माझ्या एकट्याच्या संपूर्ण मालकीचे आहे हे दर्शविणाऱ्या कराच्या पावत्या, हक्क-विलेख आणि उक्त प्राधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येतील असे इतर कागदपत्र हजर करण्याची हमी देतो.

दिनांक माहे ··········· १९ .

साक्षीदार
(पत्ता लिहावा)

१ ·····················
·····················

२ ·····················
·····················

सही ·····················

पदनाम ·····················

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. जी. साळवी,**
शासन सचिव.

(यथार्थ अनुवाद)
**प. ग. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

१. दिनांक १ जून १९७८ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.